RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४६ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.०२ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अजित पवारांकडून लोकसभेच्या ४ जागा जाहीर

### शरद पवार म्हणालेत भीती बाळगण्याचे कारण नाही

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर गेलेल्यांकडून पुन्हा प्रश्न उपस्थित केले गेले आहेत, त्याचा फारसा विचार करण्याची गरज नाही. लोकांकडे गेल्यानंतर प्रश्न विचारतील म्हणून आपल्यावर हल्ले करा आणि मुळ मुद्यांवर दुर्लक्ष करा, असा प्रकार सुरु आहे. त्यामुळे फारसा विचार करण्याची गरज नाही, आम्ही विचारांशी बांधिल आहोत, संधीसाधू नाही, अशा मोजक्याच शब्दात शरद पवार यांनी अजित पवारांवर तोफ डागली.

अजित पवार यांनी कार्यकर्त्यांच्या शिबिरात बोलताना शरद पवारांवर गंभीर आरोप केले होते. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीसाठी चार जागाही घोषित केल्या आहेत. यामुळे आरोपांना आणि अजित पवार गटाच्या भूमिकेवर शरद पवार काय उत्तर देणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष होते. शरद पवार यांनी पुण्यात बोलताना अजित पवारांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. तुमचा कार्यक्रम काय होता, तुम्ही कुणाचं नेतृत्व स्वीकारलं होतं आणि आता कुणासोबत गेला आहात, अशी प्रश्न लोक विचारणार, म्हणून आमच्यावर हल्ला करत आहेत, असा टोलाही शरद पवार यांनी लगावला. शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सामान्य लोकांमध्ये भूमिका मांडण्याची गरज आहे. भीती बाळगण्याचे काही कारण नाही. जे काही घडलं त्याची चिंता करण्याची गरज नाही.




#### नवी फळी तयार करण्याची तुमच्यात क्षमता

शरद पवार यांनी सांगितले की, तुम्हा सर्वांना नवीन संधी मिळाली आहे. विचार शेवटपर्यंत पोहचवण्याचे काम करूया. नेतृत्वाची नवी फळी तयार करण्याची तुमच्यात क्षमता आहे. काही लोकानी नवे प्रश्न तयार केले आहेत, टीका केली. त्याकडे तुम्ही लक्ष देण्याची गरज नाही. जेव्हा लोकांमध्ये जाणार तेव्हा काही प्रश्न लोकं विचारणार म्हणून ते आज बोलत आहेत. सत्ता येते आणि जाते, सामान्य लोकांचा पाठिंबा महत्वाचा आहे.

## रामलल्ला प्राणप्रतिष्ठा महोत्सवाच्या तयारीला वेग

### ४ हजार संत-महंतांना आमंत्रण, पत्रे पाठवली

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येत भव्य राम मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू आहे. यातच आता जानेवारी २०२४ मध्ये राम मंदिरात रामलल्ला प्राणप्रतिष्ठा महोत्सव होणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहे. याशिवाय श्रीराम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या वतीने देशभरातील ४ हजारांहून अधिक संत-महंतांना या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आमंत्रणे देण्यात येत आहेत. यासंदर्भातील निमंत्रण पत्रे पाठवण्यास सुरुवात झाली आहे.

रामलल्ला प्राणप्रतिष्ठा महोत्सवासाठी निमंत्रण पत्रे पाठवण्यास सुरुवात झाली आहे. या निमंत्रण कार्डाचा एक फोटो समोर आला आहे. निमंत्रण पत्राच्या पाकिटावर 'प्राण प्रतिष्ठा सोहळा' असे लिहिले आहे. त्याच्या आत एक पत्रही आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रामल्ला प्राणप्रतिष्ठापना करण्यात येईल. अभिषेक



आणि पहिली आरती होईल. २२ जानेवारी २०२४ रोजी अभिजीत मुहुर्तावर दुपारी १२ वाजून २० मिनिटांनी हा सोहळा होईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि इतर विशेष अतिथी उपस्थित राहणार आहेत.


**४ हजारांहून अधिक संत-महंत उपस्थित राहणार**

या सोहळ्याला देशभरातील विविध संप्रदायाचे ४ हजारांहून अधिक संत-महंत उपस्थित राहणार आहेत. तुम्हाला माहिती आहे की प्रदीर्घ संघर्षानंतर श्री रामजन्मभूमी येथील मंदिराचे बांधकाम सुरू आहे. पौष, शुक्ल द्वादशी, विक्रम संवत २०८०, सोमवार, २२ जानेवारी २०२४, रामलल्लाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या शुभ प्रसंगी आपण अयोध्येत उपस्थित राहून पवित्र घटनेचे साक्षीदार व्हावे आणि या महान ऐतिहासिक दिवसाची शोभा वाढवावी, अशी आमची प्रबल इच्छा आहे. २१ जानेवारीपूर्वी अयोध्येला येण्याचे नियोजन करावे, अशी विनंती करण्यात आहे. तुम्ही जितक्या लवकर अयोध्येत याल, तितकीच तुम्हाला अधिक सुविधा मिळेल. उशिरा पोहोचल्यास समस्यांना सामोरे जावे लागू शकते. २३ जानेवारी २०२४ नंतरच परत जाण्याचे नियोजन करावे, असा मजकूर पत्रात लिहिण्यात आला आहे.

## पुरावे काय मागता? हिशेब द्या; न्यायालयात हजर झाल्यानंतर राऊतांचा दादा भुसेंना इशारा

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**

शिवसेना नेते आणि मंत्री दादा भुसे यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या दाव्याच्या सुनावणीसाठी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे आज सकाळी मालेगाव न्यायालयात हजर झाले होते. यावेळी त्यांनी सामंजस्याने तोडगा काढण्यास नकार दर्शवला. राऊत म्हणाले की चोराला चोर म्हणण्याचा अधिकार मला संविधानाने दिला आहे. १७८ कोटींचा हिशोब आम्ही मागितला तर त्यात गुन्हा कसला? आम्हाला कुठे पुरावे मागता? शेतकरी रस्त्यावर आहेत. त्यांच्याकडे पावत्या आहेत. तुम्ही



आता तुरुंगात जायची तयारी ठेवा, असा इशारा देत मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे कधीही गुडघे टेकणार नाही, असे संजय राऊत म्हणाले. आता या प्रकरणी ३ फेब्रुवारीला पुढील सुनावणी होणार आहे.

दादा भुसे यांनी गिरणा सहकारी कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडून १७८ कोटी रुपये गोळा केले, त्याचा हिशोब द्या, अशी मागणी संजय राऊत यांनी केली होती. त्यावरून दादा भुसे यांनी मानहानीचा खटला दाखल केला आहे. त्याच प्रकरणी आज मालेगाव कोर्टात सुनावणी पार पडली.

तक्रारदार आणि आरोपी यांनी लोकअदालतीत बसून खटला मिटवावा असा सल्ला कोर्टाने दिला आहे. पण चोराला चोर म्हणण्याचा अधिकार संविधानाने मला दिला आहे. मी चोराला महात्मा म्हणू शकत नाही, तो घटनेचा अपमान होईल. तुम्ही अद्वैय हिरेंना तुरुंगात टाकता मग दादा भुसेंनी १७८ कोटींचा घोटाळा केला असताना त्यांना अटक का केली जात नाही, असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला.

राऊत म्हणाले की, १७८ कोटींचा हिशोब मागितला तर आमच्यावर गुन्हा दाखल करतात. प्रश्न विचारणे हा गुन्हा आहे का? मला अधिकार आहे जनतेच्यावतीने प्रश्न विचारण्याचा. ज्यांचे पैसे घेतले आहेत भुसेंनी ती लोक रस्त्यावर उतरली आहेत. या घोटाळ्यासंदर्भात अनेक वृत्तपत्रांतही आलं होतं तसंच हा मुद्दा विधानसभेतही आला होता. भ्रष्टाचाराविरोधात लढण्यासाठी जर माझ्या विरोधात खटला दाखल केला जात असेल तर तेही चालेल. पण मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आहे. मी कधीही गुडघे टेकले नाहीत, माफी मागितली नाही. ईडीला ही कधी घाबरलो नाही, असेही संजय राऊत म्हणाले.

## राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री शिंदेंची भेट

### टोल नाक्यांचा प्रश्न अन् दुकानांवरील मराठी पाट्यांबाबत चर्चा

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मनसेप्रमुखराज ठाकरे यांनी आज राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी जाऊन भेट घेतली. या भेटीत राज्यातील टोल नाक्यांचा प्रश्न आणि दुकानांवरील मराठी पाट्या लावण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी आणि दंडात्मक कारवाईबाबत प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या दुकानांवर मराठी पाट्या



लावण्याचे आदेश दिले आहेत. मराठी पाट्यांबाबतच्या निर्णयानंतर महापालिकेच्या वतीने दुकानांना आदेश देण्यात आले आहेत. दुकानदारांनी मराठी पाट्या लावाव्यात अन्यथा कारवाई केली जाईल असे आदेशात म्हंटले आहे. परंतु अजूनही काही दुकानदारांनी मराठी पाट्या न लावल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मनसेने न्यायालयाच्या आदेशानंतरही दुकांनावर मराठी पाट्या न लावणाऱ्यांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. मुंबई, नवी मुंबई, पुणे यांसह राज्यातील अनेक ठिकाणी मनसेच्या कार्यकर्त्यांनी दुकानांची तोडफोड केल्याचे समोर आले.

## नोव्हेंबर महिन्यात जीएसटी कलेक्शनमध्ये नोंदवली मोठी वाढ, सर्वाधिक वाटा महाराष्ट्राचा

**दि. २विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

देशातील जीएसटी संकलनात बंपर वाढ नोंदवली गेली आहे. अर्थ मंत्रालयाने शुक्रवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबरमध्ये जीएसटी संकलन १.६८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले होते. गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत यात १५ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. जीएसटी संकलनात सर्वाधिक वाटा महाराष्ट्राचा आहे.

नोव्हेंबर २०२३ हा महिना सरकारसाठी अतिशय अनुकूल महिना ठरला आहे. मासिक जीएसटी संकलन १.५ लाख कोटी रुपयांच्या वर पोहोचण्याचा हा सलग नववा महिना आहे. अर्थ मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर २०२२च्या तुलनेत नोव्हेंबर २०२३मध्ये जीएसटी संकलनात १५ टक्क्यांचा वाढ झाली आहे. ऋद्ध संकलन १.६० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याची २०२३-२४ या आर्थिक वर्षातील ही सहावी वेळ आहे.

सणासुदीच्या काळामुळे जीएसटी संकलनाचा आलेख चढता राहिला होता. नोव्हेंबर महिन्यात दिवाळी तसेच अन्य सणांमुळे जीएसटी संकलनात मोठी वाढ झाली आहे. नोव्हेंबर २०२४मध्ये १.६८ लाख कोटी रुपये जीएसटी संकलन झाले आहे. तथापि, गेल्यावर्षीच्या नोव्हेंबरच्या तुलनेत वाढ नोंदवली गेली असली तरी, ऑक्टोबर २०२३च्या तुलनेत नोव्हेंबरमध्ये जीएसटी संकलनात घट झाली आहे. ऑक्टोबर महिन्यात जीएसटी संकलन १.७२ लाख कोटी रुपये होते.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे नेते राजेश टोपे यांच्या गाडीवर दगडफेक

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक जालना**

महाराष्ट्राचे माजी आरोग्य मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे नेते राजेश टोपे यांच्या गाडीवर दगडफेक झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीतून ही दगडफेक झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. राजेश टोपे यांची गाडी बँकेच्या आवारात उभी होती. या गाडीवर दगडफेक झाली. राजेश टोपे यांनी या घटनेनंतर प्रतिक्रिया दिली. जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची



निवडणूक होती. या प्रकरणी आज बिनविरोध निवडणुकीची सुद्धा प्रक्रिया पार पडली. पण काही असंतुष्ट लोकांनी मुद्दाम गाडीवर दगडफेक केली. यामध्ये गाडीचा काच फुटला, असं राजेश टोपे यांनी सांगितलं.

असंतुष्ट लोकांनी हे कृत्य केलं आहे. या प्रकरणी पोलिसांनी योग्य ती कारवाई केली पाहिजे. ज्या लोकांनी कायदा हातात घेतला असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, असं माझं वैयक्तिक मत आहे. जिल्ह्यातील सर्व निवडणूक बिनविरोध पार पडलेली असताना ज्यांनी अशा पद्धतीने कायदा हातात घेऊन काम केलं असेल त्यांना खरंच शिक्षा व्हायला पाहिजे, असं मत राजेश टोपे यांनी मांडलं.

दगडफेकीची घटना घडली तेव्हा गाडीचा ड्रायव्हर आतमध्ये होता. त्याच्या जीवावर बेतलं होतं. आम्ही निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी वरच्या मजल्यावर होतो. तर ड्राईव्हर गाडीत होता, असं राजेश टोपे यांनी सांगितलं. यावेळी राजेश टोपे यांना मराठा आंदोलकांनी दगडफेक केली का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी नाही, असं उत्तर दिलं. मराठा आंदोलकांनी दगडफेक केल्याचा काहीच विषय नाही. त्याचा अजिबात संबंधच नाही. हा निवडणुकीचा विषय आहे, असं राजेश टोपेंनी स्पष्ट केलं.आम्ही सर्वांनी मिळून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सतीश टोपे यांची अध्यक्ष म्हणून निवड केली आहे. भाजपचे जावळे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. सर्वांनी मिळून ही निवड केली. पण काही दुष्ट लोक असतात, कदाचित आमदार लोणीकर यांच्या लोकांनी ही कृती घडवून आणल्याची शक्यता आहे. ज्यांनी कायदा हातात घेतला त्यांना शिक्षा झालीच पाहिजे, असं राजेश टोपे म्हणाले.

## विधिमंडळात गाजणार अमरावती मनपाचा भ्रष्टाचार : विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा तारांकित प्रश्न : शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या तक्रारींची दखल

**दि२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

७ डिसेंबर पासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात अमरावती महानगरपालिकेचा भ्रष्टाचार गाजण्याची चिन्ह आहेत .अमरावती मनपा प्रशासन आणि तत्कालीन आयुक्तांनी केलेल्या भ्रष्टाचारा संदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत राज्याचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे .अमरावती मनपाचे आयुक्त व तत्कालीन प्रशासक यांनी विकासक आणि कंत्राटदारांशी हात मिळवीत मनपामध्ये नियमबाह्य पद्धतीने विविध ठराव पारित केले .ठराव पारित करताना त्याची प्रोसिडिंग बुक मध्ये नोंद घेण्यात आली नाही. ठरावाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामाच्या वर्क ऑर्डर व करारनामा नियमांना फाटा देत करीत तसेच अटी व शर्ती बदलून विकासक व कंत्राटदारांना फायदा पोहोचवण्याचा प्रकार मनपात घडला आहे. परिणामी अगोदरच आर्थिक संकटात असलेल्या मनपाला करोडो रुपयांचे नुकसान सहन करावे लागल्याचा आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी करीत मुख्यमंत्री तसेच नगर विकास विभागाचे प्रधान सचिव आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्याकडे तक्रार केली आहे होती.अमरावती शहराचे वैभव असलेल्या संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनाचे कंत्राट असलेल्या कंत्राटदाराला फायदा पोहोचविण्याच्या उद्देशाने मनपाचे तत्कालीन प्रशासक यांनी करारनाम्यात मोठा बदल करीत मनपाचे मोठे आर्थिक नुकसान केले आहे तसेच नवसारी सर्वे क्रमांक २९ ही जागा खेळाच्या मैदानासाठी राखीव असताना देखील तत्कालीन मनपा प्रशासक आणि संबंधित अधिकारी यांनी आरक्षणात





बदल न करता बीओटी तत्त्वावर ही जागा स्पोर्ट कॉम्प्लेक्स आणि कमर्शियल कॉम्प्लेक्स उभारण्यासाठी देत तो प्रस्ताव मंजूर करीत परस्पर करारनामा केला. मनपाच्या प्रशासकीय इमारतीवर दिनाचे शेड टाकून कार्यालयाचे बांधकाम करण्यात आले. या कामावर करोडो रुपयांची उधळपट्टी करीत तब्बल आठ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला.. वास्तविक पाहता एवढ्या रकमेत नवीन इमारत उभी झाली असती. मनपा आयुक्त यांच्या निवासस्थानाची दुरुस्ती व रंगरोटीसाठी एक कोटी रुपयांचा खर्च झाल्याचे दर्शविण्यात आले आहे .प्रत्यक्षात मात्र केवळ बिलासाठी या कामाचा गाजावाजा करण्यात आल्याचे सुनील खराटे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे .या सोबतच कंपोस्ट डेपोसाठी करण्यात आलेली १७ कोटी रुपयांची निविदा आणि नवाथे मल्टिप्लेक्स साठी करण्यात आलेली निविदा या दोन्ही निविदेत त्रुटया असताना विकासकाला लाभ पोहोचविण्यासाठी नियमबाह्य काम केल्याचे अनेक मुद्दे सुनील खराटे यांनी मुख्यमंत्री व संबंधितांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. या सर्व भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती गठीत करावी आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सुनील खराटे यांनी तक्रारीतून केली आहे.

**अहवाल सादर करण्याचे आदेश**

विधान परिषद सदस्य व राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अमरावती मनपा व तत्कालीन प्रशासक यांनी केलेल्या भ्रष्टाचारा संदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे. या अनुषंगाने सविस्तर पूरक टिपणी व आवश्यक कागदपत्रांसह आपला अहवाल पाठविण्याचे आदेश नगर विकास विभागाने मनपा आयुक्तांना एका पत्राद्वारे दिले आहे.

**त्या प्रशासकावर सरकारचा वरदहस्त**

गेल्या दोन वर्षात तत्कालीन मनपा प्रशासकाने करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करीत आर्थिक संकटातील अमरावती मनपाला पुन्हा मोठ्या आर्थिक गर्तेत टाकले आहे. या प्रशासकाच्या कारनाम्यांची तक्रार मुख्यमंत्री तसेच नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे केली असता त्याची दखल घेण्यात आली नाही .त्या प्रशासकावर सरकारचा वरदहस्त असल्यामुळे कारवाई होत नसल्याचा आरोप तक्रारकर्ते शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केला आहे.

## संपादकीय ......

# दिल्ली,मुंबई शहर प्रदूषणाच्या विळख्यात

*महानगरी मुंबई तसेच देशाची राजधानी असलेले दिल्ली इतके घट्ट अडकलेय की त्यातून या दोन महानगरांची लवकर सुटका होईल असे कोणतेही चिन्ह दिसत नाही. दिवसागणिक वाहनांची वाढणारी प्रचंड संख्या, मेट्रोची कामे, विविध ठिकाणी सुरू असलेली बांधकामे पर्यावरणाची हानी करीत असल्याचे स्पष्ट झाले असून प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाय योजले जात असले तरी तो प्रकार वरातीमागून धावणार्या घोड्यांसारखा आहे. मुंबई, दिल्लीतील वाढत्या प्रदूषणाचा धसका आता लोक घेऊ लागले आहेत. इतकेच नाही तर धास्तीने काही जण थेट मुंबई, दिल्लीलाच बाय-बाय करण्याच्या निर्णयाप्रत आले आहेत.*

*एका संस्थेने या दोन शहरांसह इतर काही ठिकाणी काहींशी प्रातिनिधिक चर्चा केल्यानंतर हे वास्तव समोर आले आहे. किंबहुना ते धक्कादायक आहे. आपल्याकडे कोणतेही शहर वाढत असताना नियोजन नसते. झोपडपट्ट्या वसवून मतांची बेगमी करून ठेवण्यात आली आहे. जवळपास प्रत्येक राजकीय पक्षाने हे बेजबाबदार उद्योग केले आहेत. 'आओ जाओ घर तुम्हारा' अशी मुंबई, दिल्ली या शहरांची अवस्था असल्याने ही शहरे गर्दीने अक्षरशः फुगली आहेत. येणार्यांसाठी मग विविध सुविधा दिल्या गेल्या. त्यातूनच बांधकामे, मेट्रो अशी कामे वेगाने होऊ लागली. आज अस्ताव्यस्त कामे सुरू असताना कोठेही शिस्तीचा मागमूस नाही. त्यातून प्रदूषणाचा राक्षस माजतोय याकडे कुणालाही लक्ष द्यावेसे वाटले नाही. आता या प्रदूषणाचे गांभीर्य लक्षात येऊ लागले आहे.*

*'प्रिस्टिन केअर'ने केलेल्या सर्वेक्षणात मुंबई, दिल्लीतील १० पैकी ६ माणसे शहर सोडण्याच्या मनःस्थितीत असल्याचे समोर आले आहे. मूळ शहरवासी वाढत्या गर्दीमुळे यापूर्वीच बाहेर गेल्यानंतर आता बाहेरून आलेलेही प्रदूषणामुळे हे शहर नको म्हणण्याच्या मानसिकतेपर्यंत पोहचले आहेत. प्रदूषण आताच रोखा म्हणून पर्यावरणतज्ज्ञ गेल्या अनेक वर्षांपासून बेंबीच्या देठापासून ओरडून सांगत आहेत, परंतु त्यांनाच मूर्ख ठरविण्यात आले. आता उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर शासन, महानगरपालिका यंत्रणा प्रदूषण रोखण्यासाठी बाहेर पडल्या आहेत. प्रदूषण रोखण्यासाठी जनतेला विश्वासात घ्यायला पाहिजे, ते अद्याप होत नाही. रोज रस्त्यावर पाण्याचे फवारे मारून प्रदूषण कमी होणार नाही.*

*मुंबई, दिल्ली महानगरांप्रमाणेच छोट्या शहरांतूनही वाढणार्या प्रदूषणामुळे पहाटेचा मोकळा श्वास घेता येत नाही. ज्या परिसरात कारखानदारी वाढली तेथे हवा, पाणी याचे प्रदूषण वाढले. यावर अनेक आंदोलने झाली, पण त्यातून फार काही निष्पन्न झालेले नाही. केवळ प्रदूषणामुळे आमचे आरोग्य बिघडलेय असे सांगणारे जागोजागी भेटतील. वायू गुणवत्ता निर्देशांक आज घसरला आहे. याबाबत 'गंभीर' चर्चा होतात, मात्र गांभीर्याने काहीच घेतले जात नाही. शहरातील वाढती बांधकामे प्रदूषणाला हातभार लावत असताना ती रोखण्यासाठी कोणतीच कार्यवाही होणार नाही. तथाकथित विकासाच्या नावाखाली शहरांच्या नरड्यालाच नख लावण्यात आले आहे.*

*त्यात जनतेची घुसमट होत असताना त्यांना दिलासा देणारी कोणतीही बाब समोर येत नाही. एक काळ असा होता की ग्रामीण भागातील जनता हाताला काम नाही म्हणून मुंबईकडे धावत होती. आता मुंबईत येण्यापूर्वी दहादा विचार करावा लागत आहे. मुंबईत राहणे परवडत नसतानाही कशीतरी दाटीवाटीने राहणारी माणसे प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या आजाराने जर्जर झाली आहेत. रस्त्यावर पाण्याचे फवारे मारणार्यांनी जनतेलाही प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या रोगांवर मोफत औषधोपचार करण्यासाठी मदत करावी. ज्यांचा दोष नाही ते प्रदूषणात भरडले जात आहेत. विविध व्याधींचा सामना करत आहेत. प्रदूषणामुळे शहर सोडावे लागण्याची वेळ येण्याचा प्रसंग कदाचित भारतातच घडत असावा.*

# मनपाची १९८ दुकानांना नोटीस
## मराठी पाट्यांसंदर्भात तत्काळ कारवाई करा

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** मनपासर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिका क्षेत्रातील सर्व दुकानांवरील नामफलक मराठी भाषेत असावे याकरिता अमरावती महानगरपालिकेच्या बाजार परवाना विभागाने शहरातील १९८ दुकानांना तिसऱ्या दिवशी नोटीस बजावल्या. नोटीसची संख्या वाढणार असल्याचे विभागातर्फे सांगण्यात आले.अमरावती महानगरपालिका हद्दीतील सर्व आस्थापना व दुकानांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०१७ अन्वये नामफलक हे मराठी देवनगरी लिपीत लावणे व ते प्रारंभी लिहिणे




आवश्यक आहे तसेच मराठी भाषेतील नामफलकावरील अक्षरांचा आकार हा इतर भाषेतील अक्षरांच्या आकारापेक्षालहान असू नये, असे आदेशात नमूद आहे. त्यावर मनपा प्रशासनाने कुठल्याही प्रकारची कारवाई केली नव्हती. २५ नोव्हेंबर ही अंतिम तिथीअसतानासुद्धा नामफलक बदलविण्यात आले नाही.

यासंदर्भात मनसेतर्फे होत असलेले आंदोलन बघता त्याची दखल घेत शहरातील १९८ दुकानांना नामफलक बदलाची तात्काळ कारवाई करण्यास बजावले आहे. बाजारपेठ परवाना विभागाकडून यासंदर्भात पाच झोनमध्ये पाच टीम तयार करण्यात आल्या असून प्रत्येक टीम ही मार्केटमध्ये सर्वे करून त्याच ठिकाणी संबंधित आस्थापना व संचालकांना नोटीस देण्याची कारवाई करीत आहे

> दुकानदारांनी दुकानावरील नामफलकावरील मजकूर मराठी देवनागरी लिपीत लिहून प्रदर्शित केला असेल तर हरकत नाही. आतापर्यंत १९०. ते २०० नोटीस बजावण्यात आल्या. लवकरच शहरातील प्रत्येक दुकानांवर मराठीमध्ये पाटी झळकलेली दिसेल.
>
> **जुम्मा प्यारेवाले, उपायुक्त मनपा-**

# दर्यापूरच्या श्रावणी'ची कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्र संघात निवड

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताकदर्यापूर-** दर्यापूर शहराची ओळख ही कब्बडी खेळाची भूमी म्हणून आहे.याच लहानशा दर्यापूर शहरातून आजपर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू कब्बडी व विविध खेळातून घडले आहे.याच क्रीडा क्षेत्रात आता पुन्हा एकदा दर्यापूर शहराला सन्मान प्राप्त झाला आहे.दर्यापूर शहरातील वैष्णवी स्पोर्टींग क्लब ची खिळाडू व प्रबोधन विद्यालयाची विद्यार्थिनी कु.श्रावणी संतोष वाट हिची कब्बडी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहेबीड जिल्ह्यातील आष्टी येथे नुकत्याच राज्यस्तरीय १७ वर्षआतील शालेय कबड्डी स्पर्धा पार पडल्या.त्यामध्ये दर्यापूरची कु.श्रावणी संतोष वाट हिची चाचणीद्वारे राष्ट्रीय कब्बडी स्पर्धेसाठी राज्य संघात निवड झाली आहे.



सांघिक खेळात राष्ट्रीय स्पर्धेत खेळणारी श्रावणी ही दर्यापूरची पहिलीच महिला खेळाडू ठरणार आहे.ती दर्यापूर येथे क्रीडा क्षेत्रात कार्यरत वैष्णवी स्पोटिग क्लबची खेळाडू असून मंडळाचे अध्यक्ष डॉ अविनाश ठाकरे यांच्या मार्गर्शनाखाली व कबड्डी खेळाचे प्रशिक्षक तथा राष्ट्रीय कब्बडीपटू परिक्षीत चिकटे यांच्या मार्गदर्शाखाली ती नियमित सराव करत आहे.

तिने आपल्या यशाचे श्रेय आई वडील, प्रबोधन शाळेचे प्राचार्य,वैष्णवी स्पोर्टींग क्लब व प्रशिक्षक परीक्षित चिकटे यांना दिले आहे.तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

# सरकारी स्वस्त धान्य वितरक व केरोसीन विक्रेत्याच्या प्रश्न विधानसभेत माडंणार- आमदार यशोमती ठाकुर

**दि२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** राज्यातील विद्यमान सरकारच्या नाकर्तेपणा मुळे विकास ठप्प झाला आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांना मदत देण्याचा विषय असो कीं, स्वस्त धान्य दुकानदार वं केरोसीन परवाना धारक यांच्या समस्या प्रश्न असो याबाबत सरकारची नियत साफ नाही.सकारला सरकारी स्वस्त धान्य वितरण व्यवस्था मोडीत काढायची आहे. पण आम्ही तुमच्या सोबत असून हा प्रश्न विधान सभागृहात माडंणार असल्याचं आमदार यशोमती ठाकुर म्हणाल्या.त्यांनी आज १ डिसेंबर रोजी आपल्या विविध मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार वं केरोसीन परवानाधारक महसंघाने जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन स्थळाला भेट देऊन चर्चा करतानां आपला आंदोलनाला पाठिंबा असल्याचं त्या म्हणाल्या.यावेळी आमदार बळवंत वानखडे सुद्धा उपस्थित होते. आमदार यशोमती ठाकुर सरकारवर टीका करतानां म्हणाल्या कीं हे अवलक्षणी सरकार आहे. हे सरकार राज्यात



सत्तेत आल्यापासुन विकासाला खिळ बसली आहे. खोटी आश्वासणे, विकासाचा फक्त आभास,निधी वाटपात प्रचंड पक्षपात करणाऱ्या या सरकारच्या मनातचं खोटं आहे.शेतकरी मरतोय मरू दे, व्यवसाय बुडतात बुडू दे,फक्त आपलं चागभलं झालं बस्स इतकंच या सरकारच धोरण असल्याची टीका करून त्या म्हणाल्या कीं. सरकार भलेही शेतकऱ्यांच्या जीवावर उठले असेल, स्वस्त धान्य दुकानादार व केरोसीन परवानाधाराक यांच्या विषयी मनात खोटं असली तरी आम्ही मात्र तुमच्या पाठीशी आहोत. शेतकऱ्यांचे अश्रू पुसायला वचनबद्ध आहोत.गरज पडली तर यासाठी रस्त्यावर उतरू अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.तसेच हा प्रश्न येऊघातलेल्या अधिवेशनात मांडणार असल्याचं त्या म्हणाल्या.




# पित्ताचा त्रास असणाऱ्यांनी लसूण खाणं टाळावं

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक** -आयुर्वेदामध्ये लसूण औषधी मानला जातो. लसूण खाण्याचे अनेक फायदे आहेत. आपल्या नियमित आहारात याचा समावेश केल्यास अनेक आजारांपासून सुटका होण्यास मदत होते. काहीजण लसूण कच्चा खातात तर कोणी भाजीत, चटणी



अशा विविध पदार्थांद्वारे खातात. कोणत्याही पदार्थात लसूण घातल्यावर पदार्थाची चव वेगळीच लागते. लसणाचा वापर पचनासाठी तसेच हृदयाच्या आरोग्यसाठी श्रेष्ठ मानले जातात.

लसणाची मूळ चव तिखट आहे. पण लसणात सहा रसाचा समावेश आहे. लसणीचे मूळ तिखट, पाने कडू, देठ खारट, नाळ तुरट तर बी गोड चवीची असते. यामध्ये फक्त आंबट रस नाही. लसूण खाण्याचे जेवढे फायदे आहे तेवढेच तोटे देखील आहे. त्यामुळे आज आपण कोणत्या व्यक्तींनी लसूण खावू नये हे जाणून घेणार आहोत.

पित्ताचा त्रास असणाऱ्यांनी लसूण खाणं टाळावं.

गरोदर स्त्रियांनी देखील लसूण खाऊ नये.

नाक आणि तोंडातून रक्त येत असणाऱ्यांना लसणाचे सेवन करू नये.ज्यांना गरम पदार्थ सहन होत नाही त्यांनी देखील विचार करून लसूणाचे सेवन करावे. कारण लसूण ही उष्ण असते.

तसेच ज्यांना पोटाचे विकार, अतिसार, ॲलर्जी आहे अशांनी देखील लसणाचे सेवन करू नये.

लो ब्लडप्रेशन असणाऱ्या व्यक्तींनी देखील लसूण खाऊ नये.

लसूण खाल्ल्यामुळे रक्त पातळ होते. त्यामुळे एखादी शस्त्रक्रिया झाल्यावर सुरुवातीच्या काही दिवसात लसूण खाणे टाळावे.-

# जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती सभा; एचआयव्ही संक्रमितांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा- जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**दि२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** ११एचआयव्ही संक्रमितांसाठी शासनाव्दारे राबवित असलेल्या योजनांचा त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. एचआयव्ही संक्रमितांना जेथे औषधोपचार मिळतो, तेथेच शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. संक्रमित व्यक्ती किंवा मुले कुठल्याही शासकीय योजने पासून वंचित राहता कामा नये, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एड्स जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक घेण्यात आली, त्यावेळी श्री. कटियार बोलत होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप निरवणे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, शहरी आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, शहरी क्षयरोग अधिकारी डॉ. फिरोज खान, नेहरू युवा



केंद्राच्या जिल्हा समन्वयक स्नेहल वसुतकर, राष्ट्रीय सेवा योजनाचे प्रतिनिधी डॉ, पद्माकर सोमवंशी, आईएमएचे अध्यक्ष आश्विनकुमार देशमुख, सचिव भूपेश भोंड, स्त्री रोग तज्ज्ञ संघटनेच्या डॉ. सुयोगा पानट, विद्या तायडे, डॉ.रघुनाथ वाडेकर तसेच सामाजिक संस्थांनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले की, मेळघाट आदिवासी क्षेत्रातील बंद केलेल्या एचआईव्ही तपासणी केंद्र पूर्ववर्त सुरु करण्यासंदर्भात प्रशासकीय व राजकीय स्तरावर पाठपुरावा करावा.तसेच आईपासून बाळाला एचआईव्ही होऊ नये यादृष्टीने खाजगी डॉक्टर व रुग्णालयांच्या मदतीने अभियान राबवावे. सोबतच सर्व खाजगी दवाखान्यात औषध उपचार घेणाऱ्या सर्व एचआईव्ही संक्रमित व्यक्तीची नोंद शासकीय केंद्रामध्ये करण्याचे सूचना यावेळी त्यांनी दिल्या. जागतिक एड्स दिनानिमित्त शहरी व ग्रामीण भागात एचआईव्ही संदर्भात जनजागृती मोहिम राबवावी, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

समिती सभामध्ये मागील तीन महिन्याचा कामाचा आढावा जिल्हाधिकार यांनी घेतला. सोबतच एचआईव्ही संबंधित कार्यक्रम आणि त्या संबंधित येणाऱ्या अडचणीवर चर्चा करण्यात आली. १ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. त्याअनुषंगाने महिनाभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. त्याबाबतचे नियोजनाची माहिती यावेळी सादर करण्यात आली.

# नमो महारोजगार राज्यस्तरीय मेळावा ९ व १० डिसेंबरला; तरूणाईला मिळणार रोजगारांची संधी

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत सुशिक्षित बेरोजगारांसाठी नमो महारोजगार मेळावाचे आयोजन जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, नागपुर विद्यापीठ, नागपूर येथे दि. ९ ते १० डिसेंबर २०२३ रोजी होणार आहे. या मेळाव्याला पात्र सुशिक्षित नोकरी इच्छुक युवक, युवतींना सहभागी व्हावे, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता जिल्हा कौशल्य विकास. रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त द.ल. ठाकरे यांनी केले आहे. नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित उमेदवारांना स्थानिक तसेच इतर जिल्ह्यातील नामवंत खासगी कंपन्या, कारखाने आणि उद्योगसमूहांच्या माध्यमातुन चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत नमो महारोजगार राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात विविध उद्योजकांना आवश्यक




असणाऱ्या वेगवेगळ्या पात्रतेच्या पदाकरीता कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील व मुलाखत देवून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी मिळेल. या मेळाव्यामध्ये गरजू विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट देवून कॅंडिडेड रजिस्ट्रेशन या बटनावर क्लिक करा व रिक्त पदांना अप्लाय करण्यापुर्वी कंपनीस अँड पॉझिशन लिस्ट या बटनावर क्लिक करून डाउनलोड झालेल्या यादीतुन आपल्या शैक्षणिक अर्हतेनुसार उपलब्ध पदांची नावे पाहावी, त्यानंतर नेस्ट बटनावर क्लिक करून त्यात आपला आधार व मोबाईल नंबर टाकुन व्हेरिफीकेशन करून घ्यावे. आपली वैयक्तिक, संपर्क व शैक्षणिक माहिती भरावी तसेच ऑगनायजेशन सेक्टर निवडावे. एका पेक्षा जास्त सेक्टर निवडता येईल. कमाल चार आस्थापनाकडील उपलब्ध पदांना अप्लाय करून सबमिट बटनावर क्लिक करावे. आपली रजिस्ट्रेशन स्लीप पीडीएफची प्रिंट काढुन मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत काही अडचण असल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती या कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ किंवा रीरींरींळीक्षसरीसारळश्र.लो या ई-मेल वर संपर्क साधावा. नमो महारोजगार मेळावास स्वर्चाने बायोडाटा, पासपोर्ट फोटो व आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे.

दै.विदर्भ प्रजासत्ताक अंक नि:शुल्क पाहिजे असल्यास आम्हाला तुमच्या नावासह टेक्स मेसेज किंवा व्हाट्सअप करा आमचा मो.नंबर ८६२४९८५६३३ संपर्क करा.

# वैद्यकीय संशोधन आणि आरोग्य सेवा क्षेत्रात देशाला अग्रणी करावे-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवाचे उद्घाटन

**दि२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** –माफक दरातील सुलभ वैद्यकीय उपचार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असून कोविडसारख्या महामारीने मजबुत आरोग्य यंत्रणेची गरज अधोरेखित केली आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय संशोधन आणि आरोग्य सेवा क्षेत्रात देशाला अग्रणी बनविण्यासाठी निर्धाराने प्रयत्न करुन जागतिक स्तरावर नाविन्यपूर्णतेचे केंद्र म्हणून देशाची ओळख प्रस्थापित करावी, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेडिकल) अमृत महोत्सवाचे उद्धाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यावेळी उपस्थित होते.नव्या आधुनिक तंत्रज्ञानासोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात नवे परिवर्तन घडविण्याची गरज प्रतिपादित करून राष्ट्रपती म्हणाल्या, वैश्विक स्तरावर सर्वांना उत्तम आरोग्य सुविधा देण्याचे ध्येय साध्य करण्यात डॉक्टरांची अपुरी संख्या हे एक महत्वाचे कारण आहे. त्यामुळे वैद्यकीय सुविधांचा लाभ प्राप्त होण्यात असमानता निर्माण झाली आहे. ती दूर व्हावी यासाठी केंद्र सरकारकडून जिल्हा रुग्णालय संलग्नित वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्यास मदत केली जात आहे. यामुळे प्रादेशिक असमतोल आणि शहरी–ग्रामीण दरी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच आरोग्य सेवांच्या विकासासोबतच त्या परवडणाऱ्या असाव्यात, या उद्देशाने जगात सर्वात मोठी असणारी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविण्यात येत आहे. आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून आरोग्य विषयक दस्तावेजांचे डिजिटायझेशन करण्याचे सरकारचे प्रयत्न प्रशंसनीय



आहेत. त्यामुळे आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

अवयवदानाबाबत समाजात पुरेशी जागरुकता नसल्याने गरजू रुग्णांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र त्यासोबतच अवैधरित्या अवयव विक्रीचे प्रकारही घडत असल्याबाबत खंत व्यक्त करुन वैद्यकीय क्षेत्राने अवयवदानासाठी जनजागृती करावी तसेच मानसिक आरोग्याच्या समस्येचाही सहानूभूतीने विचार करावा असे आवाहन राष्ट्रपतींनी केले.

मध्य भारतात गेल्या ७५ वर्षांपासून वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्य सेवा प्रदान करण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची त्यांनी विशेष प्रशंसा केली. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणाऱ्या वैद्यकांची मोठी फळी निर्माण केल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी काढले.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या नुतनीकरणासाठी शासनाने भरीव निधी दिल्याबद्दल समाधान व्यक्त करुन श्री. गडकरी म्हणाले, नव्या सुविधांनी सुसज्ज होणारे हे रुग्णालय व महाविद्यालय वाढती गरज भागवू शकणार आहे. या महाविद्यालयाने नागपुरसह लगतच्या राज्यातही उल्लेखनीय वैद्यकीय सेवा दिली असून विशेषत: कोविडकाळातील योगदान प्रशंसनीय आहे. पूर्व विदर्भात सिकलसेल, थॅलेसेमियाचे रुग्ण लक्षणीय संख्येने आढळून येतात. अमृत महोत्सवाचे औचित्य साधत लवकरच बोन मॅरो विषयक उपचार सुविधेची सुरुवात होणार आहे.

स्थापनेवेळी आशियातील सर्वात मोठे वैद्यकीय महाविद्यालय अशी ओळख असणाऱ्या या संस्थेने प्रारंभापासूनच सेवाभाव जपत असंख्य रुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत. ही देशातील एक महत्वाची वैद्यकीय संस्था असून अनेक विख्यात तज्ज्ञ या संस्थेने दिल्याचा विशेष उल्लेख करुन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाविद्यालयाच्या सुविधांमध्ये काळानुरूप बदलाची गरज होती. यासाठी अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाविद्यालयाला नवे स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी शासनाकडून ५५० कोटींचा निधी देण्यात आला असून लवकरच कायापालट होणार आहे. एक अत्याधुनिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय म्हणून त्यास नवे रुप मिळणार आहे. त्याअंतर्गत शस्त्रक्रिया कक्ष, अद्ययावत यंत्र सामग्री, वसतिगृह, नवीन इमारती, क्रीडांगण, कॅन्सर इन्स्टिटच्युट आदींची उपलब्धतता होणार असून पुढील ५० वर्षांची गरज या निमित्ताने पूर्ण होणार आहे. सर्वसामान्यांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळाव्यात हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यात या संस्थेचे योगदान मोलाचे ठरणार आहे. आयजीएमसीसाठीही ४०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री यावेळी म्हणाले. दर्जेदार आरोग्य सुविधांसाठी राज्यात दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती देऊन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, निवासी वैद्यकीय अधिका–यांची १ हजार ४३२ पदांची पदभरती होणार आहे. या माध्यमातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यासोबतच नवीन प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयांसाठी आशियाई विकास बँकेमार्फत चार हजार कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बी.एसस्सी नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. नर्सिंग, तांत्रिक, अतांत्रिक संवर्गातील ५ हजार १८२ पदांची भरती प्रकिया पूर्ण झाली असून लवकरच नियुक्तीपत्र देण्यात येणार असल्याचे श्री. मुश्रीफ यावेळी म्हणाले.

तत्पूर्वी, महाविद्यालयांशी संबधित चार मान्यवरांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयातून उत्तीर्ण पहिल्या तुकडीचे विद्यार्थी डॉ. बी. जे. सुभेदार, महाविद्यालयासाठी जमीन दान करणारे कर्नल डॉ. कुकडे यांचे नातू ड.दिनकर कुकडे आणि या महाविद्यालयाला मदत करणाऱ्या डॉ. शकुंतला गोखले यांचे नातेवाईक रवी लिमये व डॉ. प्रमोद गिरी यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नवनिर्मित सभागृहाचे डिजिटल पद्धतीने उद्घाटनही करण्यात आले. विशेष डाक तिकीटाचे अनावरण करण्यात आले. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते स्मरणिका आणि कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी केले.

# अवकाळी पाऊस व गारपिटीमुळं नुकसान मधून अमरावती जिल्हा बाद

**दि२ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** – अवकाळी पाऊस व गारपिटीमुळं नुकसान झालेल्या २२ जिल्ह्यांच्या प्राथमिक यादीतून अमरावती जिल्हा वगळण्यात आला आहे. या प्रकारामुळं कॉंग्रेस नेत्या आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.



प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी शुक्रवारी (ता. १) या प्रकारासाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना जबाबदार धरले. दुसऱ्या जिल्ह्यातील मंत्र्यांना लांबच्या जिल्ह्यांचं पालकत्व दिलं की असंच होणार, असं ठाकूर म्हणाल्या.सरकारचं शेतकऱ्यांकडं पूर्ण दुर्लक्ष आहे. संपूर्ण राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळं नुकसान झाले आहे. अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवकाळी पावसामुळं शेतकऱ्यांची पिकं उद्ध्वस्त झाली आहेत. सरकारनं २२ जिल्ह्यातील प्राथमिक नुकसानीची आकडेवारी अहवालात दिली आहे. परंतु त्यात अमरावती जिल्ह्याचा समावेशच नाही. अमरावतीला वगळण्यात आलं, असं ठाकूर म्हणाल्या.

राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये ३ लाख ९३ हजार ३२५ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झाल्याचं सांगण्यात येत आहे. वस्तुस्थिती हा आकडा बराच मोठा आहे. प्रशासनानं जाहीर केलेल्या यादीत पश्चिम विदर्भातील बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, गडचिरोलीचा समावेश आहे. अमरावती जिल्ह्याला यातून का वगळ्यात आलं, असा सवालही त्यांनी केला. अमरावती जिल्ह्यातील पंचनाम्यांची कार्यवाही अद्याप अपूर्ण आहे का? ती पूर्ण झाली नसेल तर प्रशासनावर मंत्र्यांचा कोणता वचक आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.अमरावतीचं दुर्दैव आहे की, जिल्ह्याला दूरवरचे पालकमंत्री मिळाले आहेत. पालकमंत्री चंद्रकांत पाटील सगळ्याच गोष्टींकडं दुर्लक्ष करीत आहेत. अधिकाऱ्यांवर त्यांचा वचक नाही. अशात मंत्र्यांच्या दुर्लक्षामुळं शेतकऱ्यांनी आत्महत्या करावी का, अशीच सरकारची इच्छा आहे का? असा संताप त्यांनी व्यक्त केला. नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात या संदर्भात प्रश्न विचारणार असल्याचंही आमदार ॲड. यशोमती ठाकूर म्हणाल्या. मदत न मिळाल्यामुळं अमरावती जिल्ह्यात एकही शेतकरी आत्महत्या झाली, तर आम्ही सरकारला सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी सरकारला दिला. कॉंग्रेसही राज्यातील पिकांच्या हानीची माहिती घेत आहे. सरकारजवळ शेतकऱ्यांना देण्यासाठी पैसा नाही. त्यामुळं ते थातूरमातूर पंचनामे करून एखादं पॅकेज देऊन मोकळं होऊ शकते. आम्हीही नुकसानीची माहिती घेतोय. त्यात मोठी तफावत आढळल्यास आम्ही सरकारला योग्य त्या प्रमाणात नुकसानभरपाई देण्यास बाध्य करू, असंही आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी स्पष्ट केलं

# कल्याण नगर येथे शिवमहापुराण कथेचे आयोजन

## रामाश्रयी सुश्री रामप्रियाजी करणार कथा वाचन

**दि२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – परमहंस श्री संत बालयोगी गजानन बाबा यांच्या ६३ व्या जन्मदिनानिमित्त कल्याण नगर येथे शिव महापुराण कथेचे आयोजन ४ डिसेंबर ते ११ डिसेंबर दरम्यान करण्यात आल्याची माहिती कार्यक्रमाचे मुख्य आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी दिली.कल्याण नगर येथील परमहंस श्री संत बालयोगी गजानन बाबा कथा मंडप येथे होणाऱ्या शिव महापुराण कथेचे वाचन आचार्य गुरुवर्य सुधांशुजी महाराज यांच्या कृपा पात्र शिष्य रामाश्रय सुश्री रामप्रियाजी माई या



करणार आहेत .चार डिसेंबर ते ११ डिसेंबर दरम्यान दुपारी या वेळात शिवमहापुराण कथा होणार असून चार डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता तीर्थस्थापना व अभिषेक होईल त्यानंतर भव्यदिंडी करण्यात येणार आहे. ११ डिसेंबर रोजी शिवमहापुराण कथेचा समारोप होणार असून या सप्ताहास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत बालयोगी गजानन बाबा संस्थान कल्याण नगर अमरावती व शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे , व,प्रशांत वानखडे, रमेशभाऊ काठोळे, हरिहर इंगोले, शंकरराव पांडे, प्रदीप देशमुख, संजय गेडाम, विजय गुप्ता, केतन मसतकर, राहुल पवार, चंदू बारड, संजय काळे, अनिल चितळे, चंदन लोंढे,सुनील चितळे सुमित जयसिंगपूरे पंकज पांडे विशाल भेंडे सुनील जगताप वैभव देशमुख संजय वाकडेराहुल खंडार सुनील मसतकर ठाकरे काका रोहन चितळे बंटी यादव अनुराग किल्लेकर गजानन तायडे रामावत महाराज यांनी केले आहे .

### विदर्भ स्तरीय वारकरी दिंडी स्पर्धेचे आयोजन

शिवमहापुराण कथा सोहळ्याचे औचित्य साधून विदर्भस्तरीय वारकरी सांप्रदायिक दिंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. चार डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता कल्याण नगर येथून दिंडी सोहळ्यास प्रारंभ होईल .अमरावती शहरातील मुख्य मार्गावरून मार्गक्रमण करीत सर्व दिंड्यांचे राजकमल चौकात गोल रिंगण आणि राजापेठ चौकात उभे रिंगण रंगणार आहे .या स्पर्धेत विदर्भातील विविध ठिकाणच्या वारकरी दिंड्या सहभागी होत आहे. या दिंड्यांमधून प्रथम येणाऱ्या दिंडीस ३१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाच्या दिंडीस २१००० रुपये व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या दिंडीस ११ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट मृदंग वादक आणि गायकास देखील रोख पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती सुनील खराटे यांनी दिली.

# विद्यापीठ कुस्ती संघाची दमदार कामगिरी

## सुवर्ण पदकासह ९ खेळाडूंनी गाठली पात्रता फेरी

**दि२विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** चंदिगढ विद्यापीठ येथे संपन्न झालेल्या दक्षिण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुस्ती पटूनी चमकदार कामगिरी करून या संघातील एकूण ५ मुली आणि ४ मुलांनी अखिल भारतीय स्पर्धेची पात्रता फेरी गाठली आहे. संघातील युवाशक्ती महाविद्यालयाच्या अतुल याने ७० किलो वजन गटात सुवर्ण पदक जिंकून लौकिक प्राप्त करून पात्रता फेरी गाठली तर प्रदीप पवार, नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिड, कृष्णा हरणवाल, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, आसेगाव पूर्णा, सिद्धार्थ गवई, कला, वाणिज्य महाविद्यालय, येवदा यांनी आपापल्या वजन गटात विजय मिळवून पात्रता फेरीत



प्रवेश निश्चित केला. मुलींमध्ये कोमल गवई, धनश्री पाथरे, खुशबू चौधरी सर्व डी.सी.पी. ई अमरावती, प्रेरणा अरुडकर, सालुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजा आणि अंजली कोतरवार, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला यांनीही दमदार कामगिरी करून पात्रता फेरी गाठली. पुरुष संघाचे प्रशिक्षक म्हणून पोलीस विभागातील अनुभवी खेळाडू अतुल तायडे आणि जितेंद्र डिके यांची तर महिला प्रशिक्षक म्हणून निकिता ढवळे यांची नियुक्ती करण्यात आली होती. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. राजेश चंद्रवंशी, आर.एल. टी. महाविद्यालय अकोला आणि डॉ. ए. एन. देवरे, प्रभारी प्राचार्य, इन्नानी महाविद्यालय, कारंजा लाड यांनी चोख जबाबदारी निभावली. संघाच्या चमकदार कामगिरीबद्दल कुलगुरू डॉ प्रमोद येवले, प्र कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, प्राधिकारिणीचे सर्व सदस्य, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात.

# अनाकलनीय आणि अतर्क्य कथानक असलेले एकाग्र आत्मा आज प्रेक्षकांच्या भरगच्च उपस्थितीत सादर

आज शनिवार दि. २ रोजी स्यमंतक बहुउद्देशीय संस्था, अमरावती निर्मित, योगेश सोमण लिखित व प्रसाद खरे दिग्दर्शीत संघर्ष ' हे नाटक संत ज्ञानेश्वर नाट्य गृहात सायंकाळी ठीक ७.०० वाजता सादर होईल. रसिक प्रेक्षकांनी कृपया नोंद घ्यावी अशी विनंती स्पर्धा समन्वयक ॲड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्वयक श्रद्धा पाटेकर व विशाल फाटे यांनी केले आहे.

**दि२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – ६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे मधे अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीत आज दि. १ डिसेंबर रोजी तुषार काकड लिखित आणि दिग्दर्शीत एकाग्र आत्मा नाटक सादर करण्यात आले. रसिक प्रेक्षकांची सर्वाधिक उपस्थिती हे स्पर्धेचे वैशिष्ट्य आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि संचालक सांस्कृतिक कार्य बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात स्पर्धेची ही प्राथमिक फेरी संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून या मालिकेत आज जिहाद या नाटकाच्या सादरीकरणाने आणखी एक पुष्प ओवल्या गेले.

पडदा वर जातो आणि विक्रम आपल्या मेलेल्या मुलाला जिवंत करण्यासाठी घैसास या तांत्रिकाकडे जंगलात घेऊन येतो. तेथील रहस्यमय वातावरण, अंधश्रद्धांनी व्यापलेल्या संकल्पना, कधी कधी गूढ होतं जाणारे संवाद असे ' हटके कथानक असलेले हे नाटक सुमेध यांच्या महामाया निळावंती ' या कादंबरीवर बेतलेले आहे.

त्या मुलाला जीवन्त करण्याच्या खटाटोपात विक्रम सोबत असलेली मुलगी नलू गायब होते आणि विक्रमच्या



लक्षात त्या घैसास बाबाची भंपकगिरी लक्षात येते. मग दोघे परस्परावर कुऱ्हाडीने हमला करतात आणि नंतर प्रवेश होतो एका परराष्ट्रीय शिकाऱ्याचा आणि सुरु होतात न समजणारे संवाद. पहिल्या अंकाचा पडदा पडतो जवळपास दीड तासाने. तांत्रिक बाजू म्हणजे नेपथ्य अंकित जावळेकर आणि ओंकार दहिवाल यांनी सांभाळली. तुषार काकड लिखित आणि दिग्दर्शीत दिग्दर्शीत एकाग्र आत्मा ( कथा निळावंतीची )या नाटकाची निर्मिती श्री नटराज शैक्षणिक व सांस्कृतिकसंस्था, अमरावती यांनी केली आहे.

आजच्या या नाट्यकृतीत भूमिका साकारणारे कलावंत, विक्रम – प्रथमेश दिग्रसकर, कुशल – श्रेयष नाचनकर, नलू – आराधी ठाकूर, घैसास – विराग जाखड, हेलबर्ग – पवन इंद्रेकर, पूज्य – सुयश बाबर, सेंबियन – पयोशणी ठाकूर, यादव – यश डगंगे, अविनाश – अंकित जवळेकर, आनंदा – यश वाकळे, निळावंती – उर्वशी डेकाते आणि सहकलावंत – यश जोंधळे, कृष्णा बिचुकले, यश जिरापुरे, अनय साखरे, संदीप भुरके, वैभव आखरे, सोहम राऊत, गौरव जोंधळेकर, गौरी माहूरकर, कोमल राऊत, अनिकेत, यांनी भूमिका साकारल्यात.

# खून, जबरी चोरीची उकल २४ तासात, पोलिसांना प्रशस्तीपत्र,पाठीवर कौतुकाची थाप

## पोलीस अधीक्षक विशाल आनंद हस्ते सत्कार



**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती– :** तिवसा येथील सराफा व्यावसायिकाची हत्या करून त्यांच्या घरातून तब्बल ७५ लाख रुपयांचा ऐवज चोरून पळणाऱ्या मारेकऱ्यास अवघ्या २४ तासात जेरबंद करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी शुक्रवारी येथे झालेल्या क्राईम मिटिंगदरम्यान त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

### टीम एलसीबी, टीम तिवसा

एलसीबीतील अंमलदार त्र्यंबक मनोहर, संतोष मुंदाणे, सुनिल महात्मे, बळवंत दाभणे, पुरुषोत्तम यादव, रविन्द्र बावणे, सचिन मिश्रा, शकिल चव्हाण, भुषण पेठे, युवराज मानमोठे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, रविन्द्र व–हाडे, शांताराम सोनोने, निलेश डांगोरे, अमोल केन्द्रे, से. अजमत, शांताराम सोनोने, मंगेश लकडे, सचिन मसांगे, चंद्रशेखर खंडारे, पंकज फाटे, सुधिर बावणे यांच्यासह तिवसा पोलीस ठाण्यातील रोहित मिश्रा, अरविंद गावंडे, राजेश गावंडे, संतोष अढाऊ, सागर डोंगरे व सायबर पोलिस ठाण्यातील सागर धापड व सरिता चौधरी यांना गौरविण्यात आले.

### यांच्या पाठीवर पडली कौतुकाची थाप

एलसीबीचे पोलीस निरिक्षक किरण वानखडे, तिवसाचे ठाणेदार, प्रदीप ठाकुर, एलसीबीमधील सहायक पोलीस निरिक्षक सचिन पवार, सायबरचे किरण औटे, स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरिक्षक नितीन चुलपार, संजय शिंदे,

मुलचंद भांबुरकर, मो. तस्लीम, तिवसाचे पीएसआय राजेश पांडे या अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

२७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी तिवसा येथील सराफा व्यापारी संजय मांडळे हे घरी एकटे असतांना अज्ञात आरोपीने त्यांना ठार मारले होते. तथा घरातील सोने, चांदी व नगदी असा एकुण ७४,६८,००० रुपयांचा ऐवज देखील चोरून नेला होता. घटनेचे गांभिर्य पाहता पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक विक्रम साळी, उप–विभागीय पोलीस अधिकारी सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनात तपासाची दिशा निश्चित करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखा, तिवसा पोलीस स्टेशन व सायबर पोलिसांनी २४ तासांच्या आत आरोपी रोशन दिगांबर तांबटकर (२५, रा. देऊरवाडा) याला गुन्हयात अटक केली. तथा त्याच्याकडून ७,७५,००० रुपयांचा माल जप्त करण्यात यश मिळविले. सीसीटिव्ही फुटेज व अन्य कुठलाही परिस्थितीजन्य पुरावा नसताना खाकीने २४ तासात मारेकरी पकडला. एसपींनी पत्रपरिषद घेऊन कामगिरी बजावणाऱ्यांना गौरविले जाईल, अशी ग्वाही दिली होती. त्यानुसार, १ डिसेंबर रोजी स्थानिक मंथन हॉलमध्ये झालेल्या गुन्हे बैठकीदरम्यान प्रशस्तीपत्र व पुष्प देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# महापरिनिर्वाण दिनासाठी धावणार अमरावती– मुंबई अनारक्षित विशेष रेल्वे गाडी

## ५ डिसेंबरला मुंबईकडे जाणार, ७ डिसेंबर रोजी मुंबई येथून अमरावतीला परतणार

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने अमरावती ते मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान अनारक्षित एक विशेष गाडी चालिण्याचा निर्णय घेतला आहे. ही गाडी ५ डिसेंबर रोजी अमरावती रेल्वे स्थानकाहून मुंबईकडे रवाना होईल, तर ७ डिसेंबर रोजी मुंबई येथून अमरावतीला परत येणार आहे.

अमरावती– मुंबई अनारक्षित विशेष गाडी क्रमांक. ०१२२१८ ही ५ डिसेंबर रोजी अमरावती येथून ५ वाजून ४५ मिनिटांनी रवाना होईल. आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजून २५ मिनीटांनी पोहोचेल. विशेष गाडी क्रमांक ०१२१७ ही गाडी ७ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून १२ वाजून ४० मिनीटांनी वाजता सुटेल आणि अमरावती येथे त्याच दिवशी १२ वाजून ५० मिनीटांनी पोहोचेल.



या गाडीला बडनेरा, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, दादर आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या रेल्वे स्थानकावर थांबे देण्यात आले आहे. एकूण या गाडीला १४ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असणार आहे. या विशेष गाडीने प्रवास सुखकर व्हावा आणि प्रवासादरम्यान कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रवाशांनी वैध तिकीट घेऊन प्रवास करण्याचे आवाहन भुसावळ रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी जीवन चौधरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# शहापुरात काँग्रेस पक्षाला खिंडार

## बच्चू कडू यांच्या उपस्थितीत प्रहारमध्ये प्रवेश

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार,**तालुक्यातील शहापूर येथे काँग्रेस पक्षाला मोठे खिंडार पडले असून सहकारातील एका मोठ्या गटाने बच्चू कडू यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वावर विश्वास ठेवत प्रहार जनशक्ती पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून देशात काँग्रेसने 'मोहब्बत'चे दुकान उघडले असतांना सुद्धा त्यांच्याच पक्षाचे नेते, कार्यकर्ते एका पक्षातून दुसर्या पक्षात प्रवेश करीत आहेत. असाच काहीसा प्रकार तालुक्यात शहापूर गावात घडला आहे.



अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षासोबत एकनिष्ठ असलेल्या काँग्रेसच्या सहकारातील एका मोठ्या गटाने गाव व मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता एकाच वेळी बच्चू कडू यांच्या उपस्थितीत प्रहार जनशक्ती पक्षामध्येमध्ये जाहीर प्रवेश केलेला आहे. यावेळी आ. बच्चू कडू यांनी प्रवेश घेतलेल्या सर्वांचे हार व पुष्प देऊन स्वागत केले. प्रवेश घेतलेल्यांमध्ये राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार प्राप्त तथा माजी खरेदी विक्री संस्था संचालक उमेश बगणे, माजी खरेदी विक्री संस्था संचालक राहुल डवरे, हिरुर सेवा सहकारी संस्थेचे संचालक श्रीकृष्ण अमझरे व ज्ञानेश्वर अमझरे, बाळू अमझरे, नंदू अमझरे, विलास अमझरे, धानोरा ग्राप सदस्य नितीन डवरे यांचा समावेश आहे. या कार्यक्रमा च्या वेळी प्रहारचे तालुकाध्यक्ष संतोष किटुकले, बाजार समितीचे संचालक अश्विन भेटाळू, दीपक भोगाडे, राहुल म्हाला, तुषार देशमुख व शहापूर येथील ग्रामस्थ तसेच प्रहारचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात दोनशे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचा मुक्काम वर्षभरासाठीच; ना पत्ता, ना कार्यालये?

## भाड्याच्या ईमारतीतून चालतो कारभार

### १३६ कोटींची मागणी मिळाले २७ लक्ष

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** राज्यातील सामाजिक वनीकरण विभागात कार्यरत वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची दैनावस्था झालेली असून १८० वनपरिक्षेत्राला त्यांचे हक्काचे कार्यालय, लिपीक नसल्याने वनाधिकारी वनीकरण विभागात येण्यास धजावत आहेत. या आर्थिक वर्षात या विभागाला केवळ २७ लाख रुपये मिळाले, अनेकांची भाडे थकीत आहे.



वनविभागाचे अंग असलेल्या सामाजिक वनीकरण विभागात राज्यात एकूण ३३ विभाग कार्यरत असून २८९ वनपरिक्षेत्र अधिकारी या विभागात कार्यरत आहेत. या विभागाचे प्रमुख कार्यालय पुणे येथे असल्याने नागपूर येथे स्थलांतरित करणे गरजेचे बनले आहे. सामाजिक वनीकरणात रोप निर्मिती, रस्त्याच्या कडेला रोपवने, गटात वृक्ष लागवड, हरित सेना उपक्रम, मग्रारोहयो कामे, शेतकरी बांध लागवड, बांबू रोपे निर्मिती असे कामे चालतात. मात्र प्रादेशिक वनविभागाच्या तुलनेत या विभागाल तुटपुंजा निधी मिळतो. राजपत्रीत अधिकाऱ्यांचा दर्जा असताना शासकीय वाहने, सहाय्यक कर्मचारी मिळत नाही.

# धान्य व फूड्स मशीनचे देशातील सर्वात मोठे प्रदर्शन सोलापुरात

## १०० पेक्षा अधिक कंपन्या भाग घेणार

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक सोलापूर :** धान्य व फुड्स मशीनचे भारतातील सर्वात मोठे प्रदर्शन मिलेट टेक एक्सपो व ग्रेन इंडियाचे तेरावे प्रदर्शन सहा ते आठ डिसेंबर रोजी विष्णू मिल कंपाउंड ग्राउंडवर आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन सकाळी १० ते ६ या वेळेत होणार असल्याचे सोलापूर डाळ मिल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण भुतडा आणि सचिव लक्ष्मीकांत तापडिया यांनी सांगितले. रेल्वे स्टेशन जवळील विष्णू मिल कंपाउंडच्या ग्राउंडवर हे प्रदर्शन होत असून १०० पेक्षा अधिक कंपन्या भाग घेणार आहेत. डाळी, तांदूळ, गहू, मिलेट्स, मसाले, मैदा, बेसन, गहू, पोहे, शेंगदाणे, मका, काजू, ऊस अशा विविध धान्यांवर प्रक्रिया करण्यासाठी लागणारी मशिनरी या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. सरकी, सोयाबीन अशा विविध बियांपासून बनणारे तेल ज्या मशीन मधून तयार होते ती मशिनरी देखील या प्रदर्शनात पाहायला मिळेल.



केंद्र सरकारने यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय मिलेट्स इयर ( भरडधान्य) म्हणून जाहीर केले आहे. विविध मशिनरींचे थेट प्रात्यक्षिक या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. सोलापूर तसेच लातूर, उस्मानाबाद, गुलबर्गा, विजापूर या सोलापूर जिल्ह्याच्या परिक्षेत्रातील जिल्ह्यांमधील डाळ मिल ओनर्सना त्यांच्या कारखान्यांमध्ये अत्याधुनिकीकरण करण्यासाठी या यंत्रसामुग्रीचा उपयोग होणार आहे.

या कार्यक्रमच्या आयोजनामध्ये राजेंद्र तापडिया मार्गदर्शन करत आहेत, असे असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण भुतडा व सचिव लक्ष्मीकांत तापडिया यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस नितीन घटोळे, राहुल सोमाणी व अक्षय जव्हेरी उपस्थित होते.

# अवकाळीमुळे २.४ लाख हेक्टर बाधित, ६१० जनावरांचा मृत्यू, पंचनामे सुरु

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** विभागात २६ नोव्हेंबरपासून सतत अवकाळीचा पाऊस, अतिवृष्टी होत आहे. या चार दिवसात तब्बल २,०३,७६४ हेक्टरमधील पिकांना फटका बसला आहे. या आपत्तीमध्ये लहान–मोठ्या ६१० जनावरांचा मृत्यू झाला तर १४० घरांची पडझड झाल्याचा प्राथमिक अहवाल आहे. या बाधित क्षेत्राचे पंचनामे आता सुरु झालेले आहे. या आपत्तीमध्ये चार



दिवसात ६१० शेळ्या, मेंढ्यासह बैलदेखील मृत झालेला आहे. यामध्ये २६ नोव्हेंबरला १८५ शेळ्या व मेंढ्या, २७ ला २४४, २८ ला १३० तर २९ नोव्हेंबरला ५१ जनावरांचा मृत्यू झालेला आहे. याशिवाय अवकाळीच्या चार दिवसात १४० घरांची पडझड झालेली आहे. यामध्ये २६ नोव्हेंबरला ५३ , २७ ला २२, २८ ला २६ तर २९ नोव्हेंबरला २६ घरांची पडझड झाल्याचा विभागीय आयुक्त कार्यालयाचा प्राथमिक अहवाल आहे. अवकाळीमुळे चार दिवसात २,०३,७६४ हेक्टरमधील कपाशी, तूर, हरभरा, फळपिके, भाजीपाला, कांदा, संत्रा, केळी आदी पिकांचे मोठे नुकसान झालेले आहे.

# पोषण आहारात अंडी नको! जैन समाज, वारकरी संप्रदाय आणि शाकाहारी लोकांचा विरोध

## शासनाने तात्काळ निर्णय मागे घेण्याची जोरदार मागणी

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** सरकारी शाळांमध्ये शालेय पोषण आहारात अंडी आणि केळीचा समावेश करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश शाळांना देण्यात आले आहेत. प्रत्येक बुधवारी किंवा शुक्रवारी विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी देण्यात यावीत अथवा अंडा पुलाव, बिर्याणी देण्यात यावीत. जे विद्यार्थी अंडी खात नाहीत, त्यांना पर्याय म्हणून केळी देण्यात यावी, असे शासन आदेशात नमूद आहे. मात्र, या निर्णयाला सर्वत्र विरोध होत आहे. काही ठिकाणी मोर्चे देखील काढले जात आहेत. हा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी अखिल भारतीय पुरोहित महासंघ, बजरंग दल, ब्राह्मण संघटना, जैन, मारवाडी समाजाने केली आहे. अंड्याला सोया पदार्थ, उडीद, गूळ–शेंगदाण्याचा लाडू, सुकामेवा असे पर्याय सुचवले आहे.

काही दिवसांपूर्वीच कर्नाटकातील एका शाळेत शिक्षकाने ब्राम्हण विद्यार्थिनीला बळजबरी अंडे खाऊ घातल्याचा प्रकार घडला होता. यानंतर आता राज्य शासनाने शालेय पोषण आहारात अंड्यांचा समावेश करण्याचा अध्यादेश मागे घ्यावा, या मागणीचे निवेदन सकल जैन समाज आणि शाकाहारी शिष्टमंडळ सर्व जिल्ह्यांमध्ये देत आहेत.



शालेय पोषण आहारत विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी किंवा अंड्याचा पुलाव देण्याचा निर्णय अंडी उत्पादक शेतकऱ्यांसाठी हिताचा असला तरीही राज्यातील जैन समाज, वारकरी संप्रदाय आणि शाकाहारी लोकांच्या मनाला ठेच पोहोचवणारा आहे. पूर्ण शाकाहारी असलेल्या नागरिकांची येणारी पिढी मांसाहारी बनवण्याचे शासनाचे षडयंत्र आहे.

पोषण आहारात अंडी देण्याचा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. अंडे शाकाहारी आहेत की मांसाहारी हा चर्चेचा विषय होऊच शकत नाही. अशा चुकीच्या प्रथा सुरू झाल्यास त्या वाढत जातील. जे झाडापासून येईल तेच शाकाहारी आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ हा निर्णय मागे घ्यावा.

**– सतीश पेंढारी, अध्यक्ष, दिगंबर जैन महासभा विदर्भ.**

सकल जैन समाज आणि शाकाहारी नागरिक हे कदापि सहन करणार नाहीत. हा अध्यादेश तात्काळ मागे घ्यावा, नाहीतर सकल जैन समाज आणि शाकाहारी लोक तीव्र आंदोलन करतील, असा इशारा जैन समाजाने दिला आहे.

# 'अमरावती-पुणे-अमरावती' एसटीसाठी ठरले लाभदायी; १८२ फेऱ्यांमधून ३८ लाखांचे उत्पन्न



दि.२ विदर्भ प्रजासत्ताक
**अमरावती**

सणासुदीच्या काळात अमरावती ते पुणे ये-जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढते. दिवाळीच्या दिवसांत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागाने नियमित फेऱ्यांसोबतच विशेष योजना राबविली. अमरावती विभागातर्फे तब्बल २५ बसगाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती. पुणे ते अमरावती दरम्यान १०२ फेऱ्या आणि अमरावती ते पुणे दरम्यान ८० फेऱ्यांची वाहतूक करण्यात आली. अशा एकूण १८२ फेऱ्यांमधून एसटी महामंडळाला ३८ लाख १ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

अमरावती-पुणे-अमरावती या प्रवास व्यवस्थेचा लाभ एकूण ९ हजार ४५६ प्रवाशांनी घेतला. गेल्या वर्षी याच कालावधीत एसटी महामंडळाने ११४ फेऱ्यांचे नियोजन केले होते, त्यातून २८ लाख ३१ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवले होते, तर ६ हजार २०० प्रवाशांची वाहतूक केली होती. यंदा प्रवाशांच्या संख्येत वाढ होण्यासोबतच उत्पन्नातही भरघोस वाढ झाली आहे. दिवाळीच्या वीस दिवसांमध्ये एसटी महामंडळाच्या अमरावती विभागाने ८ कोटी १६ लाख ४५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. गेल्या वर्षी ६ कोटी ९४ लाख रुपये इतके उत्पन्न मिळाले होते.

### भाडेवाढीचा परिणाम नाही

एसटी महामंडळाने प्रवासी भाड्यामध्ये केलेल्या १० टक्के भाववाढीचा विशेष परिणाम झालेला नाही. प्रवाशांची संख्या वाढण्यासोबतच उत्पन्नातही वाढ झाली आहे. लांब पल्ल्याच्या प्रवासी वाहतुकीसाठी एकूण ४०० फेऱ्यांचे नियोजन करण्यात येते. नियमित फेऱ्यांपैकी २५ टक्के उत्पन्न हे लांब पल्ल्याच्या वाहतुकीतून होत असते, असे महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे मत आहे.

# प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेची सखोल चौकशी करा : बिरसा क्रांती दलाची मागणी

दि.२विदर्भ प्रजासत्ताक
**अमरावती १**

प्रकल्पस्तरीय सुरू असलेली क्रीडास्पर्धा रद्द करण्यात यावी, सन २०१९ ते २०२४ या वर्षात पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेची सखोल चौकशी करण्यात यावी, अधिकारी गिरडकर यांची विभागीय चौकशी करावी, अशी मागण बिरसा क्रांती दलाचे अध्यक्ष अर्जुन युवनाते यांनी शुक्रवारी (ता.१) निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणीअंतर्गत शासकीय अनुदानित आश्रम शाळेतील घे प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा दरवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा प्रकल्प कार्यालय धारणी यांनी घेण्याचे ठरविले आहे.परंतु गत तीन-चार वर्षापासून क्रीडा चे स्पर्धेवर लाखो रुपये खर्च केले जातात, री पण आदिवासी विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात मी मागासलेलाच आहे. क्रीडा स्पर्धेच्या बरे नावाने आत्तापर्यंत कोटी रुपये खर्च करण्यात आले. प्रकल्प अधिकारी स्थानिक पुरवठादार, संस्था, विक्रेते यांना



लाखोंचे टेंडर देऊन ही स्पर्धा न घेतली जाते. परंतु या टेंडर प्रणालीमध्ये आदिवासी सामाजिक संस्था, बचत - गट, महिला बचत गट कुठेही दिसून येत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

आदिवासी विकास विभाग आदिवासीच्या उत्थानासाठी कार्यरत असून, आदिवासींचा विकास व्हावा त्यासाठी न्यूकलेस बजट अंतर्गत ४० हजारापर्यंत वैयक्तिक योजना मंजूर करतात. यामध्ये आदिवासींचा विकास होणार का? आदिवासी उद्योगपती होणार का? असा प्रश्न निवेदनातून उपस्थित करण्यात आलेला आहे. प्रकल्प क्रीडा स्पर्धेअंतर्गत लाखोंचे टेंडर काढले जाते, मात्र यामध्ये कुठल्याहीपद्धतीची जाहिरात आदिवासीपर्यंत पोहचत नाही. आदिवासी समाजालावंचित ठेवण्याचे षडयंत्र प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी करीत असल्याचा आरोप निवेदनातून केला आहे. २०२३-२४ ची क्रीडास्पर्धा रद्द करण्यात यावी. २०१९-ते २०२४ पर्यंत झालेल्या क्रीडा स्पर्धेची विभागीय चौकशी करण्यात यावी, संबंधित अधिकारी गिरडकर यांची खातेनिहाय चौकशी करण्यात यावी, क्रीडा स्पर्धा रद्द झाली नाही तर अप्पर आयुक्त कार्यालयासमोर डिसेंबरपासून बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी व आदिवासीं अप्पर आयुक्तांना बिरसा क्रांती दलतर्फे देण्यात आला.

निवेदन देताना जिल्हाध्यक्ष अर्जुन युवनाते, रोहित झाकर्डे, उमेश सोळंके, अतल परतेकी. मनीष धुर्वे,वैभव लोखंडे,सोम सोळंके,पिंटू सोळंके उपस्थित होते.

# श्रीशिव महापुराण कथा, पोलिस आयुक्तालयात बैठक

दि२विदर्भ प्रजासत्ताक
**अमरावती :**

खासदार, आमदार राणा दाम्पत्य आणि हनुमान चालिसा ट्रस्टच्या वतीने १५ ते २० डिसेंबर छत्री तलाव रोड हनुमान गढी, अमरावती या दरम्यान श्रीशिव महापुराण कथा आयोजित केली आहे.

यासंदर्भात आयुक्तालयात पोलिस पोलिस उपायुक्त सागर पाटील यांच्या मुख्य नियंत्रणात शुक्रवारी बैठक पार पडली. यावेळी परवानगी समिती, पार्किंग समिती, कलश यात्रा



समितीचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. अमरावतीत प्रथमच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे श्रीशिव महापुराण कथाकार प्रदीप मिश्रा यांच्या वाणीतून विदर्भातील भक्तांना या कथेचा लाभ होणार आहे. तसेच, या कथेच्या अनुषंगाने एक लाख महिलांचा सहभाग असलेला कलश यात्रेचे १५ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पोलिस उपआयुक्त सागर पाटील यांनी आढावा घेतला. या बैठकीला चंद्रकुमार जाजोदिया, सुनील राणा, निळकंठ कात्रे, विनोद जायलवाल, विनोद गुहे, यांच्यासह सहायक पोलिस आयुक्त शिवाजीराव बचाटे, कैलास पुंडकर, पोलिस निरीक्षक मनीष ठाकरे, सीमा दाताळकर, गोरखनाथ जाधव, नितीन मगर, बाबाराव अवचार आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोकअदालत ९ डिसेंबरला

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव-जी. आर. पाटील यांची माहिती

दि.२विदर्भ प्रजासत्ताक
**अमरावती**

राष्ट्रीय विधिसेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधिसेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबईच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. आर. देशपांडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ९ डिसेंबरला सकाळी १०.३० वाजता जिल्हा विधिसेवा प्राधिकरण, अमरावती व जिल्हा वकील संघ,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालय अमरावती येथे तसेच अमरावती जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालये ,कामगार न्यायालय व औद्योगिक न्यायालय,,कौटुंबिक न्यायालय,ग्राहक तक्रार निवारण मंच आणि इतर सर्व न्यायालये येथे राष्ट्रीय लोकअदालत चे आयोजन करण्यात आले आहे. लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित



असलेले तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, भु-अर्जन मामल्याची प्रकरणे,महसुली प्रकरणे,वैवाहिक संबंधातील वाद प्रकरणे, बँका व अन्य वित्तीय संस्थांचे नुकसान व वसुली प्रकरणे व तडजोडीस पात्र असणारी सर्व प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली निघणार आहे. लोक अदालतीमध्ये वाद मिटविण्यासाठी न्यायाधीश,तज्ज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे मंडळ पक्षकारांस मदत करेल.तसेच लोक अदालतीमध्ये प्रकरण ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क भरावे लागणार नाही व लोकअदालतीचे निवाड्याविरुद्ध अपील नसल्याने वाद कायमचा मिटतो. न्यायालयाच्या हुकुमानाम्याप्रमाणे लोकअदालतीत निवाड्याची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी पुरावा,उलट तपासणी,दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.लोकअदालतीत वाद मिटविल्याने वेळेची व पैश्याची बचत होते.या संदर्भात अधिक माहिती देताना अमरावती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे सचिव -जी. आर. पाटील यांनी दिली.

# पोलिस प्रशासनाच्या संकल्पनेला नितीन देशमुख यांच्या सकारात्मक प्रतिसाद

## शेगाव नाका परीसरात लावले सीसीटीव्ही

दि.२विदर्भ प्रजासत्ताक
**अमरावती**

अमरावती शहराचे पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी तसेच सागर पाटील, मनिष ठाकरे, संजय अढाऊ पोलिस निरीक्षक शहर वाहतुक शाखा पुर्व विभाग व पोलिस आयुक्त अमरावती शहर यांनी शहरातील व्यस्त चौकांमध्ये कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतुक नियमनाच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यन्वीत करण्याची सुचविलेली संकल्पना पुर्णत्वास नेण्याचे दृष्टीने समाजाप्रती संवेदना व सजग असलेल्या नागरिकांना याबाबत माहिती दिली.



पोलिस प्रशासनाने शहरातील व्यस्त चौकांमध्ये कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतूक नियमनाच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करण्याचे आवाहन समाजाप्रती संवेदना व सजग असलेल्या नागरिकांना केले होते. या संकल्पनेला प्रतिसाद देत नितीन देशमुख यांनी १ डिसेंबर रोजी स्वखर्चाने पोलिस स्टेशन गाडगेनगर जवळील शेगाव नाका चौक या अत्यंत वर्दळ असलेल्या व्यस्त चौकात चारही दिशेने देखरेख ठेवता येईल अशी सीसीटीव्ही यंत्रणा बसवुन व कार्यन्वीत करून दिली आहे.

नितीन देशमुख शेगाव नाका चौकात नव्याने बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेचा पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच वाहतूक नियमनाकरीता अत्यंत उपयोग होणार आहे. याचप्रमाणे पुढील काळात वाहतूक विभाग अमरावती शहरचे वतीने शहरातील काही समाजसेवी संस्था वसामाजिक दायित्वाचे काम करणार सुजान नागरिकांच्या सहकार्यान पंचवटी चौक, बसस्थानक, राजकमल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, (ईर्वीन) या गर्दीच्या ठिकाणी क्रमशः सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीर करण्याचा मानस आहे. या सामाजिक कार्यात पुढाकार घेवुन वाहतुक विभाग व पोलिस विभागास आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक विभाग अमरावतीच्या वतीने करण्यात आले आहे.



# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती 'रुधिरमुलम' लोकांकिका स्पर्धेच्या विभागीय अंतिम फेरीत दाखल

दि.२विदर्भ प्रजासत्ताक
**अमरावती**

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची हृदयस्पर्शी थरार एकांकिका रुधिरमुलम् ची निवड महाराष्ट्रातील प्रतिष्ठित लोकांकिका करंडक च्या नागपूर केंद्राच्या विभागीय अंतिम फेरीसाठी झाली असून दिनांक ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे या एकांकिकेचा विभागीय अंतिम प्रयोग सादर होणार आहे.सुश्रुत संहितेमधील देहस्य रुधिरं मूलं रुधिरेणैव धार्यते।तस्मात् यत्नेन संरक्ष्यं रक्तं जीव इति स्थितिःया श्लोकाच्या गर्भितार्थातील रक्तदानाचे महत्व विषद करीत धार्मिक संघर्ष, पारिवारिक आत्मीयता, अवयव दान यासारख्या अत्यंत महत्वपूर्ण



विषयांवर भाष्य करून रक्तदान हेच जीवनदान हा संदेश देणारी डॉ चंद्रकांत शिंदे लिखित एकांकीकेचे मंचन करण्यात आले होते.

अत्यंत भावनास्पर्शी आणि थरारक पद्धतीने महत्वपूर्ण विषय मांडण्याचे काम या एकांकिकेच्या माध्यमातून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. उत्कृष्ट लिखाण, प्रभावी अभिनय आणि सांघिक सादरीकरण या तीनही पातळ्यांवर उच्च गुणवत्ता साधणाऱ्या या एकांकिकेचा प्राथमिक फेरीतील प्रयोग दिनांक ३० नोव्हे. २०२३ रोजी नागपूर येथील विनोबा भावे सभागृहात पार पडला.

या एकांकिकेत राघव या युवकाची मध्यवर्ती भूमिका स्वराज गणेश राठोड या विद्यार्थ्याने तर इतर प्रमुख भूमिकांमध्ये सुलेमान च्या थरारक भूमिकेतून प्रियांशु श्रीकांत गावंडे, सकीना च्या भूमिकेत भूमिका रवींद्र इंगोले यांनी आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांना खिळवून ठेवले. तसेच रुद्राणी कृष्णकांत बारब्दे, शरयू बाबुराव गावंडे, विश्वास प्रवीण चव्हाण, नितीन धर्मेंद्र चक्रे, कौशल प्रमोद खान्देतोड, सायली संजय इंगळे यांनी आपल्या उत्कृष्टपणे उत्कृष्टपणे वठविल्या. ऋतुजा पट्टेबहादूर (संगीत), समृद्धी माहोरे (रंगभूषा) जिया डहाके (नेपथ्य), अक्षय मुळे (वेशभूषा) या विद्यार्थ्यांनी आपले बहुमोल कामगिरीतून एकांकिक्त विशेष रंग भरले.

उपस्थित कला रसिकांसोबतच परिक्षकांची देखील मने जिंकून या एकांकिकेने विभागीय अंतिम फेरीत धडक मारली आहे.

## महात्मा फुलेंचे विचार आत्मसात करण्याची गरज : मंदाकिनी निमकर

दि.२विदर्भ प्रजासत्ताक
**अमरावती**

सध्या समाजात विद्वेशाचे वातावरण पसरत चालले असून अशावेळी खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांचे विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण समितीच्या अध्यक्षा श्रीमती मंदाकिनी निमकर यांनी केले. महात्मा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात महात्मा फुले



यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव प्राचार्य आर बी पवार, विद्यालयाचे प्राचार्य मंगेश गोरडे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी देखील महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे केली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख प्रा. किशोर श्रीखंडे, डॉ जयंत पवार, प्रा संजय शेंडे, गजानन पोटदुखे, अनिल इंगळे, जयश्री आडे,श्रीनील मावस्कर,मिलिंद बेलसरे,किसन चव्हाण, राजेश्वर ढेवले यांनी परिश्रम घेतले.

# अचलपूर कृषी बाजार समितीवर ३२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

## सभापती २४ तास ऑन ड्युटी; शेतमालाची चोरी थांबणार?

दि२विदर्भ प्रजासत्ताक
**परतवाडा**

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर ३२ सीसीटीव्ही कॅमेरे नजर ठेवून आहेत तर सभापती आपल्या मोबाईलच्या माध्यमातून २४ तास बाजार समितीच्या संपर्कात आहेत. त्यांनी आपला मोबाईल बाजार समितीच्या कामकाजाशी जोडला आहे. मुख्यालययी नसतानाही राज्याच्याच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यांतूनही भ्रमंतीदरम्यान ते त्यांच्या मोबाईलवर बाजार समितीच्या कामकाजाचे अपडेट्स मिळवितात.




अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा मुख्य परिसर २६ एकरांचा असून यात मुख्य यार्डसह टीएमसी का यार्डचा समावेश आहे. मध्य प्रदेशसह का मेळघाटातील आदिवासींकरिता ही प बाजार समिती दिलासादायक हरली आहे. मध्य प्रदेशातील शेतकरी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आपला शेतमाल विक्रीस आणतात.अचलपूर बाजार समितीनेयापूर्वी बँकेकडून ३ कोटी ५८ लाख, ३ कोटी १० लाख, ३ कोटी २५ लाख, रुपयाचे कर्जाची उचल केली होती. पारदर्शक व्यवहार, संचालक मंडळासह अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकतेने अचलपूर बाजार समितीची या कर्जातून मुक्ती झाली आहे.

**सोलर एनर्जीला प्राधान्य**

अचलपूर बाजार समितीने यार्डसह प्रशासकीय कार्यालयात सोलर सोलर एनर्जीचा वापर करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात बाजार समितीच्या प्रशासकीय कार्यालयावर १५ किलोवॅटचे सोलर पॅनल बसविले आहेत. त्यातून वर्षाला विजेच्या बिलापोटी लाखो रुपयाची बचत होणार आहे. दुसऱ्या टप्प्यार बाजार समितीचे मुख्य यार्ड आणि टीएमसी यार्ड परिसर सोलर एनर्जी खाली आणल्या जाणार आहे. याकरिता २५ ते ३० किलोवॅट वीजनिर्मिती करणारे सोलर पॅनल स्वतंत्ररीत्या बसविल्या जाणार आहेत.

# विमा न काढलेल्या शेतकऱ्यांनी नोंदणी कुठे करायची साहेब? शेतकऱ्यांसमोर गंभीर प्रश्न : कशी मिळणार नुकसान भरपाई?

दि.२ विदर्भ प्रजासत्ताक
**मोर्शी**

ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे व अचानक झालेल्या पावसाने अशा शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, ते शेतकरी ऑनलाइन नोंदणी करीत आहेत; परंतु ज्यांनी पीक विमा काढलाच नाही, अशा शेतकऱ्यांनी करायचे काय, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

कापूस ,तूर काढणीचा हंगाम सुरू असताना अनेक शेतकऱ्यांनी धान कापणी करून ठेवली होती. मात्र, जिल्ह्यात शनिवार,रविवार पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे, अशा शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाकडून ७२ तासांत ऑनलाइन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.त्यामुळे ऑनलाइन सेंटरवर शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली आहे. मात्र, काही शेतकऱ्यांनी पीक विमा बरोबरमिळत नसल्याने पीक विमा काढलाच नाही; परंतु नुकत्याच झालेल्या पावसाने अशा शेतकऱ्यांचेही आर्थिक नुकसान झाले आहे.पीक विमा काढला नसल्याने अशा शेतकऱ्यांनी कुणाकडे नोंदणी करायची, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.शेतपीक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचेही पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

# अधिवेशन फक्त दहा दिवसांचे , विदर्भाच्या प्रश्नांसाठी पाच दिवस विशेष द्या : आ. बच्चू कडू यांची मागणी

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नागपूर करारानुसार दरवर्षी विधिमंडळाचे एक अधिवेशन विदर्भातील प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी नागपुरात घेतले जाते. विदर्भातील प्रश्नांवर सविस्तर चर्चा व्हावी, अशी अपेक्षा असली तरी अपवादात्मक काळ सोडला तर हे अधिवेशन दोन आठवड्यापेक्षा अधिक चालत नाही, यंदाही कामकाजाचे दहाच दिवस आहेत. मराठा-ओबीसी आरक्षणाचा वाद, अवकाळी पावसाने झालेले नुकसान यासह अन्य महत्त्वाचे प्रश्न असल्याने विदर्भाच्या प्रश्नांना किती स्थान मिळेल याबाबत साशंकताच व्यक्त केली जाते.अधिवेशनात विदर्भाचे मुद्दे मांडायला पाच दिवस विशेष देण्यात यावे अशी मागणी आ. बच्चू कडू करणार आहेत.



हिवाळी अधिवेशन ७ पासूनच सुरू होणार असन ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. हा एकूण १४ दिवसांचा काळ असला तरी सुट्यांचे दिवस वगळता प्रत्यक्षात कामकाज १० दिवस होणार आहे. साधारणपणे अधिवेशनाची सुरूवात आठवड्याच्या पहिल्या दिवसापासून म्हणजे सोमवारपासून होते. यावेळी गुरूवारपासून होणार असल्याने पहिल्या आठवड्यात दोनच दिवस कामकाज होईल.. पहिल्या दिवशी शोकप्रस्तावावरील चर्चेनंतर कामकाज तहकूब केले जाते. दुसऱ्या दिवशी सध्या गाजत असलेल्या मराठा आरक्षणावर चर्चा दिवसभर चालण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणासोबत ओबीसींच्या प्रलंबित मागण्यांवरही चर्चा करण्याची मागणी होत आहे. त्यामुळे पहिल्या आठवड्यात तरी विदर्भाच्या प्रश्नावरील चर्चेला वेळ मिळण्याची शक्यता कमी आहे. दुसऱ्या आठवड्यातील पाच आणि त्यानंतरच्या आठवड्यातील तीन असे एकूण आठ दिवस शिल्लक उरतात.



त्यात विदर्भ वगळता राज्याच्या इतर भागातील मुद्दे, राजकीय कारणांवरून होणारे गदारोळ आणि वेळेवर येणाऱ्या विषयांच्याय गर्दीत विदर्भातील प्रश्नांना पुरेसा वेळ मिळण्याची शक्यता दरवर्षी प्रमाणे यंदाही कमीच आहे.

विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, रखडलेले विविध प्रकल्प, अनुशेष, पुनर्वसन, नागपूरसह विदर्भातील पूरस्थिती व त्यामुळे झालेली प्रचंड हानी, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे, वसतिगृह, संत्री उत्पादकांच्या अडचणी, समृद्धी महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यात आलेले अपयश, धान खरेदी केंद्र सुरू होण्यास विलंब झाल्याने शेतकऱ्यांची झालेली पिळवणूक यासह विदर्भाचे अनेक महत्वाचे प्रश्न प्रश्नांची यादी मोठीआहे. या शिवाय मागील हिवाळी अधिवेशनात दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेचा मुद्दाही या अधिवेशनात वैदर्भीय आमदार उपस्थित करण्याची शक्यता आहे.

## शेतकरी नवरा नको गं बाई; पस्तिशीतही नवरी मिळेना!

# मुलींना शासकीय नोकरदारच नवरा हवा; मुलांना सतावतेय लग्नाची चिंता



**दि.२विदर्भ प्रजासत्ताक तिवसा**

पूर्वी मुला-मुलींचे लग्न आई- वडिलांकडून ठरविण्यात येत होते. बऱ्याचदा मुला व मुलींचे विचारसुद्धा विचारात घेण्यात येत नव्हते; मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बहुतेक मुले व मुली स्वतः आपल्या पसंतीच्या मुलांची, तर मुले आपल्या पसंतीच्या मुलींची निवड करतात.

आता ऑनलाइन संकेतस्थळावर अनेक लग्न जुळविणाऱ्या संस्था सुरू झाल्या आहेत. त्यावर नोंदणी करून अनेकजण आपला जोडीदार निवडत आहेत. तर विवाह मेळाव्यातूनसुद्धा लग्न जुळत आहेत; मात्र संकेतस्थळावर किंवा विवाह मेळाव्यात मुलींनी नोंदविलेल्या अपेक्षा बघितल्या तर त्यांना सरकारी नोकरदार मुलगा पाहिजे, तर शहरातील उच्चशिक्षित मुलींना परदेशातील मोठा पगार कमावणारा नवरा हवा आहे. काही मुलींना व्यावसायिक किंवा खासगी ठिकाणी नोकरीवर असलेल्या मुलालासुद्धा पसंती दर्शविली आहे: मात्र अनेक मुलींनी चक्क शेतकरी मुलाला नाकारल्याचे दिसून येत आहेत्यासोबतच मुलांनीसुद्धा रंग, रूपापेक्षा कमवत्या मुलीला अधिक पसंती देत असल्याची माहिती आहे.

शेती बेभरोशाची असा समजविविध संकटामुळे शेतकऱ्यांना नेहमीच अडचणींचा सामना करावा लागतो, त्यामुळे शेती बेरभरोशाची आहे, असा चुकीचा समज झाला आहे

### या मुलांना लग्नाची अधिक चिंता

**खेड्यात राहणारा :** मुलींच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. ग्रामीण किंवा खेड्यात राहणाऱ्या मुलाला मुलींकडून नापसंती दर्शविली जात आहे. शहरात राहणारा व स्वतंत्र राहणाऱ्या मुलाला पसंती दिली जात आहे.

**कमी पगार :** महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे पगार जर कमी असेल तर अनेक मुलींकडून नकार दिला जात आहे.

**शेतकरी :** शेती व्यवसाय करणाऱ्या मुलाला लग्नासाठी स्थळ शोधताना मोठी अडचण जात आहे. नोकरीवाल्याला मुलींकडून अधिक पसंती आहे. मोठ्या प्रमाणात शेती असली तरीही नकारघंटाच दिसत आहे.

**कमी शिक्षित :** २१ व्या शतकात अनेकजण उच्चशिक्षण घेत आहेत. त्यामुळे अल्पशिक्षिताना मुलगी मिळेनाशी झाली आहे.

**कारणे काय?** मुलींच्या अपेक्षा वाढल्यालग्नासंदर्भात मुलींच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. ॲडजेस्ट करण्यास मुली तयार नसल्याचे दिसून येत आहे.

# अटकेच्या चर्चेवर मनोज जरांगेंची प्रतिक्रिया; म्हणाले, मला अटक झाल्यावर...

**दि. २ विदर्भ प्रजासत्ताक जालना**

मराठा आरक्षणावरून काही दिवसांपूर्वी बीडमध्ये हिंसाचाराची घटना घडली होती. संतप्त आंदोलकांनी काही आमदारांच्या घरासह मालमत्ता आगीच्या हवाली केली होती. या प्रकरणावरून पोलीस प्रशासन ॲक्शनमोडमध्ये आलं आहे. याप्रकरणी पोलिसांनी काही जणांना अटक केली आहे. तर अनेक आंदोलक पोलिसांच्या रडारवर आहेत. शिवाय बीड येथील हिंसाचार प्रकरणी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनाही अटक होऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. यावर आता स्वत: जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा आंदोलकांवरील गुन्हे दोन दिवसांत मागे घेतो, असं सरकारने म्हटले होते. पण त्यांनी गुन्हे मागे घेतले नाहीत. त्यामुळे माझ्या अटकेची शक्यताही असू शकते. पण मला अटक करणं सरकारला तेवढं सोपं जाणार नाही. मला अटक करायची असेल तर करू द्या. मी तुरुंगात जायला घाबरत नाही. मला अटक झाल्यावर मराठा समाज काय आहे? हे सरकारला कळेल, अशा शब्दांत मनोज जरांगेंनी सरकारला इशारा दिला आहे.

# आला हिवाळा, लालपरीने अर्ध्या तिकीटात चला सहलीला

## विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत : सुरक्षित प्रवासासाठी शाळांची पसंती

**अरुण जोशी**

**दि२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दिवाळीच्या सुट्या आटोपल्यानंतर विद्यार्थ्यांना सहलीचे वेध लागते. एसटीच्या माध्यमातून अर्ध्या तिकीटात सहलीला जाता येत असल्याने बहुतांश शाळा एसटीने सहल नेण्यास प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

आजपर्यंत केवळ पुस्कात वाचलेल्या पर्यटनस्थळाला विद्यार्थी सहलीच्या माध्यमातून प्रत्यक्ष भेट देतात. तेथील माहिती जाणून घेतात. यामुळे विद्यार्थ्यांचे अनुभव विश्व विस्तारण्यास फार मोठी मदत होते. तसेच वर्गमित्र, शालेय मित्र, शिक्षक यांच्यासोबत मोकळ्या मनाने गोष्टी करू शकतात. सहल हा विद्यार्थ्यांसाठी आनंदाची पर्वणीच आहे. त्यामुळे विद्यार्थी सहलीच्या नियोजनाची वाट बघत राहतात. विद्यार्थ्यांना कमी खर्चात सहलीचा आनंद उपभोगता यावा, यासाठी एसटी महामंडळ अर्ध्या तिकीटात विद्यार्थ्यांना सहलीला नेऊन आणते. एसटीचा प्रवास सुरक्षित मानला जाते. सहल म्हटले की, २०० किमीच्या वरच प्रवास होतो. त्यामुळे एसटीला पसंती दर्शविली जाते.जो विद्यार्थी सहलीला जाणार आहे, त्या विद्यार्थ्यांच्या पालकाने सहमती देणे आवश्यक आहे. तसेच संमतीपत्र पालकाला लिहून द्यावे लागते. हे संमतीपत्र घेण्याची जबाबदारी शाळेची राहते तरसहलीला शिक्षणाधिकारी यांची परवानगी आवश्यक आहे. तसेच जे विद्यार्थी सहलीला जाणार आहेत. त्यांच्या नावाची यादी एसटीकडे सादर करावी लागते.



### विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी ५० टक्के सवलत

सहलीसाठी विद्यार्थ्यांना ५० टक्के सवलतीत एसटी उपलब्ध करून दिली जाते. विद्यार्थ्यांचे अर्धे पैसे वाचतात. चुकीने अपघात झाल्यास एसटीकडून आर्थिक मदत सुद्धा विद्यार्थ्यांच्या पालकाला दिले जाते. त्यामुळे शाळा एसटीनेच सहल नेतात, हे विशेष.

## लग्नाच्या दुसऱ्याच महिन्यात नवविवाहितेने संपवले जीवन

**दि. २ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** लग्नाच्या जेमतेम दोन महिन्यांतच नवविवाहितेने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कोराडीत उघडकीस आली. वर्षा ऊर्फ सीमा मंगेश कडू (२६, श्री. गजानन अपार्टमेंट, प्रेमनगर, कोराडी) असे मृत महिलेचे नाव आहे. मंगेश कडू हा एका राजकीय पुढाऱ्याच्या खासगी कार्यालयात लिपिक आहे. त्याचे पहिले लग्न झाले होते. पहिल्या पत्नीकडून एक मुलगी असून सध्या घटस्फोट झाला आहे. दरम्यान, त्याची नातेवाईक असलेली वर्षा हिच्याशी ओळख झाली. वर्षाचेही पहिले लग्न झाले होते. तीसुद्धा घटस्फोटीत असून एकटी राहत होती.

# श्री समर्थ कॉलनी येथील गजानन महाराज पालखी शेगांव रवाना

## ठिकठिकाणी 'श्री' च्या पालखीचे स्वागत

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्थानिक समर्थ कॉलनी येथील श्री समर्थ गजानन संस्थानची अमरावती ते शेगाव पायदळ वारी आज शुक्रवार १ डिसेंबर शेगाव करिता रवाना झाली. यामध्ये शेकडो भाविकांनी या पायदळ वारीत सहभागी होऊन भक्तिमय वातावरणात सकाळी ७ वाजता 'श्री' च्या पालखीचे समर्थ गजानन महाराज संस्थान, समर्थ नगर येथून प्रस्थान झाले. यावेळी ठिकठिकाणी 'श्री' च्या पालखीचे सूंदर रांगोळी काढून, पूजन करून स्वागत करण्यात आले. श्री समर्थ गजानन संस्थान येथून दुसऱ्या वर्षीही शेकडो भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अमरावती ते पायदळ वारीत सहभागी झाले. सकाळी निघालेल्या श्री च्या पालखीचे सकाळी १०:३० वाजता सिकची रिसॉर्ट येथे सुनीलभाऊ भगत



यांच्यावतीने स्वागत करण्यात आले. येथून पुढे दुपारी १:३० वाजता खारतळेगाव येथील दिपकराव गुडधे परिवाराच्या तर्फे वाडीत पालखीचे पूजन करण्यात आले व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. येथून दुपारी पुढे प्रस्थान करून शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता धामोरी विद्यालय धामोरी येथे श्री च्या पालखीचे जल्लोषात स्वागत व पूजन करण्यात आले. रात्री धामोरी येथेच राहण्याची व्यवस्था पवार वेल्डिंग व जयंतराव देशमुख चेचरवाडी व प्रदीप उर्फ बंडुभाऊ हिवसे अमरावती यांच्यातर्फे निवासाची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. २ डिसेंबर ला सकाळी ७ वाजता श्री च्या पालखी येथून पुढे प्रस्थान करूण ठीकठिकाणी श्री च्या पालखीचे पूजन व स्वागत करून सायंकाळी ८ वाजता दर्यापूर येथे रावसाहेब दौलतराव धर्माळे यांच्या घरी श्री च्या पालखीचे पूजन, भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात येईल. येथून पुढे ३,४,५ डिसेंबर असा प्रवास करून ६ डिसेंबर ला श्री ची पालखीचे शेगाव नगरीत आगमन होईल. येथे गजानन महाराज संस्थान मंदिर येथे सकाळी ११ वाजता श्री ची पालखी पोहचणार आहे. येथून देव दर्शन करून दुपारी १ वाजता ट्रॅव्हल्स ने अमरावती करता प्रस्थान करतील सायंकाळी ६ वाजता समर्थ कॉलनी येथील हनुमान मंदिर येथे दिंडीसह मंदिरात आगमन व स्वागत सोहळा होईल. १० डिसेंबर ला दुपारी १२ ते ३ श्री. कोंडेश्वर संस्थान येथे पायीवारी निमित्य मावंदाचे भोजन ठेवण्यात आले आहे. श्री समर्थ गजानन महाराज संस्थानच्या या पायदळ वारी मध्ये समर्थ कॉलनी,विवेकानंद कॉलनी,रुख्मिणी नगर तसेच परिसरातील सर्व नागरिक तसेच महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## नागपुरात विमान प्रवाशांची संख्या ४१ टक्क्यांनी वाढली; राजकीय दौरे, पर्यटकांचा ओढा वाढल्याचा परिणाम

**दि.२ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

उपराजधानी नागपुरात वेगवेगळ्या कामानिमित्त देश-विदेशातून येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शिवाय ताडोबा, पेंच, कऱ्हाडला, मध्य प्रदेशमधील पेंच, कान्हाकडे पर्यटकांचा ओढा वाढला आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर ये-जा करणाऱ्यांची संख्या गेल्यावर्षीच्या



तुलनेत यावर्षी तब्बल ४१ टक्क्यांनी वाढली आहे.

करोना काळात प्रवाशांची संख्या घटली होती. ही संख्या प्रत्येक महिन्याला ३० ते ४० हजारांपर्यंत खाली आली होती. आता मात्र, दर महिन्याला २.५ लाखांपर्यंत प्रवाशी संख्या वाढली आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार, २०२३ च्या पहिल्या सहामाहीत (जानेवारी ते जून) नागपूर विमानतळाहून १५ लाख २५ हजार ५२८ लोकांनी प्रवास केला. गेल्यावर्षी याच कालावधीत १ लाख ८० हजार ३८४ प्रवाशांनी प्रवास केला होता. म्हणजेच यावर्षी तब्बल १३,४५,१४४ अधिक प्रवाशांनी विमान प्रवास केला.

नागपूरहून देशाअंतर्गत आणि परदेशात प्रवास करणाऱ्यांच्या संख्येतदेखील मोठी वाढ दिसून येत आहे. मागील वर्षी पहिल्या सहामाहीत (२०२२) नागपूर येथून परदेशात प्रवास करणाऱ्यांची संख्या १९ हजार २५० होती. चालू वर्षात (२०२३) ४५ हजार २६७ प्रवासी परदेशात गेले. देशाअंतर्गत प्रवास करणाऱ्यांच्या संख्येतदेखील वाढ झाली आहे. गेल्यावर्षी पहिल्या सहामाहीत १० लाख ६१ हजार १३४ प्रवासी संख्या होती. चालू वर्षात ही संख्या १४ लाख ८० हजार २६१ वर पोहोचली आहे.

# श्री गाडगे महाराज गोरक्षण संस्था मुर्तिजापुर येथे काकड आरती समाप्ती सोहळा गोरगरीब कुष्ठरोगी दिव्यांग वृध्दमायबापांचे अभ्यंगस्नान, अन्नदान व वस्त्रदान

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अखिल विश्वाला दशसुत्रीच्या माध्यमातून महानतेचा संदेश देणारे, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या पदस्पर्शाने पावन पुण्यभूमी असलेल्या,श्री गाडगे महाराज गोरक्षण संस्था मुर्तिजापुर येथे, गेल्या ४५ वर्षापासुन कोजागिरी पोर्णीमा ते कार्तीक पोर्णिमा पर्यंत संत गाडगेबाबांच्या विचारांना अभिप्रेत सेवाभावी काकड आरतीचे संस्थेचे सर्वेसर्वा तथा नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार,बापुसाहेब देशमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनात संचालक सागर देशमुख यांच्या वतीने विशेष आयोजन करण्यात येते. प्रामुख्याने गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा जोपासत सन १९७८ पासुन गोरक्षण संस्थेत स्व.डॉ.वासुदेवराव भुगूल यांच्या प्रेरणेतून आजतागयात सेवाव्रती बापुसाहेब देशमुख यांच्या पुढाकारातून भजन-किर्तन-हरीनाम व जनता-जनार्दनाच्या



सेवेचेकार्य काकड आरतीतून अविरतपणे सुरु आहे. दरम्यान संस्थेतर्फे पंचक्रोशीतील गोरगरीब दिव्यांग कुष्ठरोगी बाधवांचे सुंदर सुवासिक उटने लावून अभ्यंगस्नान घालून औक्षवण करत त्यांना नविन वस्त्र परिधान करत,मान्यवरांच्या हस्ते उबदार ब्लँकेट,महिलांना साड्या,टॉवेल,आदिंचे वितरण करत त्यांना सुंदर मिष्ठान्नाचे भोजन यावेळी देण्यात आले. विशेषत: या सेवाभावी सोहळ्याकरीता आ.हरिषजी पिंपळे,दानवीर नितीन दळवी,प्रसिध्द दुग्ध व्यावसायिक प्रशांत हजारी,अशोक बठेजा,सच्चीदानंद मालाणी,सौरभ मालाणी,कमल कटलरीचे संचालक अग्रवाल शेठ,संचालक कुणाल देशमुख, आदि दानशुर मंडळींचे मोलाचे सहकार्य लाभले. समाप्ती सोहळ्याला सेवाव्रती बापुसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात भव्य मिरवणुकीचे आयोजन करत संपुर्ण गोरक्षण नगरीत गोपाला गोपाला देवकी नंदन गोपालाचा गजर करण्यात आला.यानंतर काकड आरतीत महिनाभर सातत्याने सेवा देणाऱ्या सेवकांना सुंदर उबदार ब्लँकेट,शर्ट पीस,टॉवेल,मिठाई सह जिवनावश्यक साहित्याचे दानशुर नितीन दळवी यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. तद्नंतर काकड आरतीच्या स्वागताकरीता गोरक्षणातील महिलांनी व मुलींनी आकर्षक अशा संदेशात्मक रांगोळ्या व दीपोत्सव साकारणाऱ्या मुलींना संस्थेतर्फे रोख पारितोषीक रक्कम देवून त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रामुख्याने या कार्यक्रमाला आ.हरीषजी पिंपळे, आ.बळवंतराव वानखडे, समाजसेवी बबनराव दाभेराव, कमलाकर गावंडे,प्रशांत हजारी, अशोक बठेजा, संचालक गजानन देशमुख, व्यवस्थापक प्रशांत देशमुख, संचालक कुणाल देशमुख,ह.भ.प. सर्जेराव देशमुख, व्यवस्थापक प्रकाश महात्मे, सुखदेवशेठ भुतडा,प्रविण देशमुख,प्रा.रवीराज देशमुख, मुख्याध्यापक भुगूल,गजानन जवंजाळ, ऋणमोचन संस्थेचे विश्वस्त शरद पाटील, दिनेश पाटील आदिंसह श्री बाबांची भक्तमंडळी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थीत होते.